# महाराष्ट्रातील विद्यापीठांपुढील काही शैक्षणिक व शासकीय समस्या

[ मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने दिलेली व्याख्याने ]

लेखक

**वसंत हरी गोळे**

*निवृत्त कुलसचिव, पुणे विद्यापीठ*

डॉ. वि. म. दांडेकर यांस सप्रेम भेट

व. ह. गोळे

**मुंबई मराठी साहित्य संघ**

प्रथमावृत्ती : एप्रिल १९७२

© वसंत हरी गोळे

किंमत २ रुपये

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव पार्वती '
टिळक रस्ता, पुणे ३०

प्रकाशक :
दि. वि. आमोणकर
प्रमुख कार्यवाह
मुंबई मराठी साहित्य संघ
डॉ. भालेराव मार्ग, मुंबई ४

# प्रस्तावना

मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने मी दिनांक २५, २६ आणि २७ नोव्हेंबर १९७१ रोजी जी व्याख्याने दिली ती आता पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहेत. संघाच्या नियमांप्रमाणे व्याख्यानांची टंकलिखित प्रत आधीच संघाच्या हवाली केली होती. प्रत्यक्ष व्याख्यानाच्या वेळी तीत समाविष्ट नसलेली काही तपशीलवार माहिती मी श्रोत्यांना दिली. तिचा अंतर्भाव या पुस्तिकेत केलेला नाही. मूळ टंकलिखित प्रतीतला थोडा केवळ औपचारिक भाग गाळला आहे आणि काही मोजकाच मजकूर मुद्द्यांच्या स्पष्टीकरणासाठी अवश्य वाटला तेथे जास्त घातला आहे.

या प्रसंगी कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांची मला विशेषकरून आठवण होते गत वर्षी मार्च महिन्यात जेव्हा धनंजयराव पुण्यात आले होते तेव्हा मी त्यांना माझ्या नियोजित व्याख्यानांची माहिती दिली आणि कोणत्या मुद्द्यांची चर्चा करावी आणि कोणत्या ग्रंथांचे वाचन करावे याबाबत त्यांचा सल्ला मागितला. ते म्हणाले, "मी आता मे महिन्यामध्ये पुन्हा पुण्यात येणार आहे. तेव्हा मला भेट म्हणजे आपण सविस्तर बोलू." दुर्दैवाने ते मे महिन्याच्या प्रारंभी दिल्ली सोडून पुण्यास येत असताना वाटेतच त्यांचे आकस्मिक निधन झाले आणि त्यांच्या बहुमोल सल्ल्याचा लाभ मला मिळू शकला नाही. तो मिळाला असता तर प्रस्तुत व्याख्यानांतील उणिवा बऱ्याच अंशी कमी झाल्या असत्या.

शासकीय प्रश्नांची चर्चा करताना राजकीय क्षेत्रातली व्यक्तिनिष्ठ कारभाराची अनिष्ट प्रथा आता विद्यापीठांपर्यंत पोचली आहे, असे मी म्हटले होते. तेव्हा पुणे विद्यापीठातली झपाट्याने बिघडत चाललेली परिस्थिती प्रामुख्याने माझ्या नजरेसमोर होती. ती पुढे लवकरच इतकी खालावली की, कुलपतींना विद्यापीठाच्या कारभाराची

चौकशी करण्यासाठी एक समिती नेमणे भाग पडले! राधाकृष्ण आयोगाच्या अहवालातील जो भाग मी पहिल्या व्याख्यानात उद्धृत केला आहे, त्यात पुढील वाक्ये आहेत.

" सत्तास्थानावर असलेल्या बऱ्याच जणांना अभिलाषा, स्वार्थ आणि द्वेष या दुर्गुणांनी ग्रासले आहे. विद्यापीठांनी स्वतःच्या वागणुकीने सौजन्य व न्याय यांचे आदर्श समाजापुढे ठेवले पाहिजेत. परंतु दुर्दैवाने बऱ्याच विद्यापीठांत तशी परिस्थिती नाही. कारखानांना आणि उत्पादकांना कमी वाव मिळेल अशी केवळ यंत्रणा उभारून भागणार नाही. तर काम करणाऱ्या लोकांत सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होणे जरूर आहे."

पुणे विद्यापीठाची सद्यःस्थिती इतकी बोलकी आहे की, तिच्या संदर्भात वरील उताऱ्याचे औचित्य जास्त स्पष्टपणे विशद करण्याची मुळीच जरूरी नाही. आता सत्ताभिलाषा नसलेल्या सज्जनांनी संघटित होऊन विद्यापीठाच्या निरनिराळ्या अधिकारमंडळात आपला आवाज उठविणे क्रमप्राप्त आहे.

माझे विचार व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल, आणि ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल, मुंबई मराठी साहित्यसंघाचा मी अत्यंत ऋणी आहे. संघाचे प्रमुख कार्यवाह श्री. दि. वि. आमोणकर आणि संघाच्या साहित्य समितीचे कार्यवाह श्री. वि. पु. भागवत यांचे विशेष आभार मानले पाहिजेत. पहिल्या व्याख्यानात गेल्या शतकाच्या अखेरीस आणि चालू शतकाच्या प्रारंभी जी परिस्थिती होती तिचे विवेचन आहे. ती माहिती कै. श्री. सय्यद नुरुल्ला आणि श्री. जे. पी. नाईक यांच्या A History of Education in India या ग्रंथातून घेतली आहे हे कृतज्ञतापूर्वक नमूद करणे जरूर आहे पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. कृ. शं. हिंगवे आणि त्यांचे सहकारी यांनी मला हवे असलेले ग्रंथ तत्परतेने उपलब्ध करून दिले. विद्यापीठाच्या कचेरीतील माझे पूर्वीचे निकट सहकारी श्री. रं. श्री. सरदेशपांडे, श्री. ग. ज. अभ्यंकर इत्यादींनी मला निरनिराळ्या समित्यांचे अहवाल वगैरे साहित्य दिले. संदर्भ ग्रंथांची सूचि करण्याचे कामी ग्रंथालयाचे श्री. वि. कृ. मेहेंदळे आणि कार्यालयातील सौ. माधुरी रानडे यांनी मदत केली. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

पुणे विद्यापीठ आवार,
पुणे : ७
दि. १९ एप्रिल १९७२

वसंत हरी गोळे

# व्याख्यान पहिले

## ऐतिहासिक पार्श्वभूमि

उच्च शिक्षणात गेल्या पंचवीस वर्षांत जी झपाट्याने वाढ झाली, आणि जी वाढ अंशतः तरी आजच्या समस्यांस कारणीभूत आहे, तिची ऐतिहासिक पार्श्वभूमी पहिल्या व्याख्यानांत विशद करण्याचा माझा विचार आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या व्याख्यानात अनुक्रमे शैक्षणिक समस्या आणि शासकीय समस्या यांची चर्चा करावयाची आहे. परंतु शैक्षणिक प्रश्न आणि शासकीय प्रश्न हे परस्परांशी इतके निगडित आहेत की, एकाची दुसऱ्यापासून संपूर्णपणे फारकत करता येणार नाही. शासनव्यवस्था जर कार्यक्षम नसेल तर चांगली शैक्षणिक तत्त्वे अमलात आणता येणार नाहीत. त्याचप्रमाणे शासनव्यवस्थेकडे दुर्लक्ष केले तर उच्च शैक्षणिक मूल्यांचा विपर्यास होण्याची शक्यता असते. म्हणून शैक्षणिक प्रश्नांचा ऊहापोह करताना शासकीय बाजूकडे थोडे लक्ष द्यावे लागेल आणि शासकीय समस्यांची चर्चा करताना शैक्षणिक मूल्यांचा उल्लेख करणे अपरिहार्य ठरेल. परंतु दुसऱ्या व्याख्यानात मुख्यतः शैक्षणिक प्रश्नांची, आणि शेवटच्या व्याख्यानात प्रामुख्याने शासकीय समस्यांची चर्चा करण्याचे मी योजिले आहे.

हिंदुस्थानात पाश्चात्त्य धर्तीच्या उच्च शिक्षणाची सुरुवात १८५७ साली झाली. त्या वर्षी मुंबई, कलकत्ता आणि मद्रास या तीन विद्यापीठांची स्थापना झाली. आज आपल्या विद्यापीठांची संख्या शंभरावर गेली आहे. या सुमारे एकशेपंधरा वर्षांच्या कालावधीत विद्यापीठीय शिक्षणाचा कसा विस्तार आणि विकास झाला याचा आढावा घ्यावयाचा आहे. सोयीसाठी या विस्तृत कालखंडाचे चार टप्पे मी कल्पिले आहेत.

पहिल्या आताच सांगितल्याप्रमाणे मुंबई, कलकत्ता आणि मद्रास या विद्यापीठांची स्थापना हा. दुसरा एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व चालू शतकाच्या प्रारंभी कोणती परिस्थिती होती तो. तिसरा स्वराज्य मिळाल्यानंतर राधाकृष्ण आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाला आणि पूर्वीच्या मुंबई राज्यात मुंबई विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संकुचित करून पुणे, गुजरात आणि कर्नाटक विद्यापीठांची स्थापना मराठी, गुजराती आणि कानडी या भाषिक विभागांच्या उच्च-शिक्षणविषयक गरजा भागविण्यासाठी करण्यात आली तो. आणि शेवटचा १९६६ साली कोठारी आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाला तो.

शिक्षण, आणि विशेषेकरून उच्च शिक्षण, हे साध्य नसून साधन आहे. आपल्याला कोणत्या तऱ्हेची समाजरचना हवी आहे, कोणत्या मूल्यांची जोपासना करायची आहे, याविषयीच्या आपल्या कल्पना जर स्पष्ट नसतील, तर शिक्षणाच्या क्षेत्रात अराजक माजणे अपरिहार्य आहे. तसे आज दुर्दैवाने माजले आहे आणि ते कमी होण्याची आज तरी फारशी चिन्हे दिसत नाहीत. याचे मुख्य कारण अर्थातच सत्ताधारी पक्षात असलेला वैचारिक गोंधळ हे आहे. परंतु तो स्वतःला पुरोगामी म्हणविणाऱ्या विरोधी पक्षातही आहे, आणि हीच खरी शोकांतिका आहे. मी आताच जे चार टप्पे सांगितले, त्यात उच्च शिक्षणाची कोणती उद्दिष्टे मानली गेली, आणि ती साध्य करण्यासाठी कोणत्या तऱ्हेची यंत्रणा उभी केली गेली, याचा मागोवा घेणे उद्बोधक ठरेल.

आताच मी सांगितल्याप्रमाणे भारतातल्या उच्च शिक्षणाचा प्रारंभ १८५७ साली मुंबई, कलकत्ता आणि मद्रास या विद्यापीठांच्या स्थापनेने झाला. या विद्यापीठांची स्थापना "वुड यांचा खलिता" "Wood's Despatch" या नावाने प्रसिद्ध असलेल्या अहवालात केलेल्या सूचनांनुसार झाली. ईस्ट इंडिया कंपनीचे इंग्लंडमध्ये जे संचालक मंडळ होते त्याने हा खलिता हिंदुस्थानातील गव्हर्नर जनरलकडे १९ जुलै, १८५४ रोजी पाठविला. संचालक मंडळाचे अध्यक्ष सर चार्लस् वुड यांच्या सहीने तो पाठविण्यात आल्यामुळे तो "वुड्स डिस्पॅच्" या नावाने ओळखला जातो. हा अहवाल विस्तृत असून त्याचे शंभर परिच्छेद आहेत. हा भारतातील शिक्षणाच्या विकासाचा ताम्रपटच समजला जातो आणि तशाच योग्यतेच्या तो आहे. त्यात उच्च शिक्षणाबाबतच्या कोणत्या सूचना केल्या होत्या व त्यामागील विचारसरणी काय हे आता पाहावयाचे आहे.

अहवालाच्या दुसऱ्याच परिच्छेदात पुढील विधान आहे :—

"It is one of our most sacred duties to be the means of conferring upon the natives of India those vast moral and material blessings which flow from the general diffusion of useful

knowledge."

"उपयुक्त ज्ञानाच्या प्रसारामुळे जे नैतिक व ऐहिक फायदे होतात, ते येथील जनतेला मिळवून देणे हे आमचे पवित्र कर्तव्य आहे."

नंतर तिसऱ्या परिच्छेदामध्ये पुढील विधान आहे :

"We have always looked upon the encouragement of education as important, because it is calculated not only to produce a higher degree of intellectual fitness, but to raise the moral character of those who partake of its advantages, and so to supply you with servants to whose probity you may with increased confidence commit offices of trust in India, where the well-being of people is so intimately connected with the truthfulness and ability of officers of every grade in all departments of the State."

"शिक्षणास उत्तेजन देणे महत्त्वाचे आहे, कारण त्यामुळे लोकांची बौद्धिक पात्रता वाढेल एवढेच नव्हे तर नैतिक पातळीही उंचावेल. त्यामुळे ज्यांच्या सचोटीवर विश्वास ठेवता येईल असे निरनिराळ्या खात्यात विविध पातळ्यांवरील जबाबदाऱ्या सोपविता येण्याजोगे सेवक तुम्हाला मिळू शकतील. लोकांचे कल्याण कार्यक्षमतेने आणि सचोटीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवरच अवलंबून आहे."

शिक्षणाचा प्रसार करून भारतीयांची भौतिक प्रगती साधून त्यांचे जीवनमान उंचावणे, व त्यांच्या बौद्धिक प्रगतीबरोबर त्यांची नितिमत्ताही सुधारणे ही आजच्या कल्याणकारी राज्याला शोभतील अशी केवळ परोपकारी उद्दिष्टे इंग्रज शासकांची नव्हती हे उघड आहे. त्या दृष्टीने वूडसाहेबांच्या खलित्यातील पुढील उतारा बोलका आहे :

"Nor are England's marteial interests altogether unaffected by the advance of European knowledge in India; this knowledge will teach the natives of India the marvellous results of the employment of labour and capital, rouse them to emulate us in the development of the vast resources of the country, guide them in their efforts and confer on them all the advantages which accompany the increase of wealth and commerce; and secure to us a larger and more certain supply of many articles necessary for our manufacturers and extensively consumed by all classes of our population, as well as an almost inexhaustible demand for the

produce of British labour."

"भारतात युरोपीय ज्ञानाचा प्रसार झाल्यामुळे इंग्लंडच्या ऐहिक हितसंबंधावरही परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. हे ज्ञान भारतीयांना मजूर आणि भांडवलदार यांनी मिळून केलेल्या आश्चर्यजनक सुबत्तेची जाणीव करून देईल. देशातल्या अमर्याद साधनसामग्रीचा उपयोग करण्यासाठी प्रवृत्त करील. आणि परिणामतः इंग्लंडला कच्च्या मालाचा कायम आणि निश्चित पुरवठा होऊ शकेल आणि आपल्या तयार मालाला निरंतरची बाजारपेठही मिळेल."

अहवालात पुढे हेही स्पष्ट केले आहे की, ज्ञानाचा प्रसार म्हणजे युरोपीय ज्ञानाचा प्रसार, एतद्देशीय ज्ञानाचा नव्हे. युरोपीय वाङ्मय, पाश्चात्त्य विज्ञान व तत्त्वज्ञान यांचा प्रसार करणे जरूर आहे.

हे जे नवे पाश्चात्य ज्ञान भारतीयांना करून द्यायचे, त्याची बोधभाषा काय असावी असा साहजिकच प्रश्न उपस्थित होतो. अहवालात असे म्हटले आहे की, पाश्चात्त्य ज्ञान ज्यांना मिळवावयाचे होते त्यांना इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविणे अवश्य होते. कारण ते ज्ञान भारतीयांना उपलब्ध करून देणारी पाश्चात्त्य ग्रंथांची भाषांतरे झालेली नव्हती. अर्थात ज्यांना उच्च शिक्षण घ्यावयाचे होते त्यांना इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे जरूर होते. उच्च शिक्षणाची बोधभाषा काय असावी हा आजही आपल्याकडे ज्वलंत प्रश्न आहे. त्या दृष्टीने अहवालातील पुढील उतारा पाहण्यासारखा आहे.

"It is neither our aim nor desire to substitute the English language for the vernacular dialects of the country. It is indispensable that in any general system of education, the study of them should be assiduously attended to. Any acquaintance with European knowledge which is to be communicated to the great mass of the people can only be conveyed to them through one or other of these vernacular languages. While the English language continues to be made use of, the vernacular languages must be employed to teach those who are ignorant of, or imperfectly acquainted with English. As the importance of the vernacular languages becomes more appreciated, the vernacular literatures of India will be gradually enriched by translations of European books, or by the original compositions of men whose minds have been imbued with the spirit of European advancement so that European kn owledge

may be placed within the reach of all classes of the people. We look therefore, to the English language and to the vernacular languages of India together, as the media for the diffusion of European knowledge."

" एतद्देशीय भाषांच्या ऐवजी इंग्रजीचा वापर करण्यात यावा असे आमचे उद्दिष्ट नाही, आणि तशी इच्छाही नाही. शिक्षण-विस्ताराच्या कोणत्याही कार्यक्रमात स्थानिक भाषांच्या उपयोगाकडे काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे. भारतीयांना युरोपीय ज्ञान उपलब्ध करून द्यावयाचे असेल तर ते त्यांच्याच या ना त्या भाषेत करून द्याव-याला हवे. इंग्रजी भाषेचा उपयोग करताना, ज्यांना त्या भाषेचे पुरेसे ज्ञान नाही, त्यांच्या-साठी देशी भाषांचा उपयोग केलाच पाहिजे. देशी भाषांच्या महत्त्वाची जाणीव जसजशी वाढत जाईल, तसतशी युरोपियन ग्रंथांची भाषांतरे होतील, आणि युरोपियन ज्ञानाने प्रभावित झालेले लोक स्वतंत्र ग्रंथरचनाही करतील. तेव्हा युरोपीय ज्ञानाच्या प्रसारासाठी इंग्रजी आणि स्थानिक भाषा, यांचा बरोबरीने उपयोग करण्यात येईल अशी आमची अपेक्षा आहे."

कलकत्ता येथे एका विद्यापीठाची स्थापना करावी ही काही वर्षांपूर्वी केलेली सूचना स्वीकारता आली नाही. परंतु आता विद्यापीठांची स्थापना करण्यास हिंदु-स्थानातील परिस्थिती अनुकूल आहे असे म्हणून अहवालात असे मत व्यक्त केले आहे की, हिंदुस्थानातील विद्यापीठांची रचना व शासन-व्यवस्था लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर करावी. ऑक्सफर्ड व केंब्रिज विद्यापीठांप्रमाणे लंडन हे "रेसिडेन्शियल" आणि "यूनिटरी" स्वरूपाचे विद्यापीठ नव्हते, तर ते महाविद्यालये संलग्न करून घेणारे विद्यापीठ होते. भारतातील बहुसंख्य विद्यापीठांची रचना आज मितीसही लंडन विद्यापीठाप्रमाणेच आहे.

उच्च शिक्षणाची ज्ञानगंगा बहुजनसमाजापर्यंत पोचावयास हवी अशी भाषा आज आपण ऐकतो. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, याच प्रकारची विचारसरणी वुडच्या अहवालात व्यक्त केलेली आहे. या संदर्भात पुढील उतारा पाहावा—

"(Previous policy) has led to too exclusive a direction of the efforts of Government towards providing the means of acquiring a very high degree of education for a small number of natives of India drawn from the higher classes. It is well that every opportunity should have been given to those classes for the acquisition of a liberal European education, the effects of which may be expected slowly to pervade the rest of their fellow-countrymen and to raise

the educational tone of the community. But the higher classes are both able and willing to bear a considerable part of the cost of their education. Our attention should now be directed to a consideration which has been hither-to too much neglected; namely, how useful and practical knowledge may best be conveyed to the great mass of the people, who are incapable of obtaining education by their own efforts."

"पूर्वीच्या धोरणानुसार उच्च शिक्षण हे केवळ वरच्या श्रेणीतील काही मोजक्या लोकांनाच दिले गेले. अशा लोकांना उदार युरोपीय शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देणे योग्यही होते. कारण त्यामुळे हळूहळू समाजाच्या सर्व स्तरांमध्ये युरोपीय शिक्षणाचा प्रसार झाला आणि एकंदर समाजाचा शैक्षणिक कस वाढला. परंतु उच्च वर्गीयांना स्वतःच्या शिक्षणाचा खर्च झेपण्याची ऐपत आहे आणि तो सोसण्याची त्यांची इच्छाही आहे. आता मात्र आपले लक्ष आतापर्यंत ज्याची उपेक्षा झाली त्या कामाकडे वळले पाहिजे. ते म्हणजे जे स्वतःच्या हिमतीवर शिक्षण घेऊ शकत नाहीत, त्या बहुजनांना उपयुक्त शिक्षण देणे हे."

शिक्षण देण्याची प्रत्यक्ष जबाबदारी या नवीन विद्यापीठांनी कोणत्या प्रमाणात स्वीकारावी याबाबत वूडच्या खलित्यात असे म्हटले आहे की, नव्या भारतीय विद्यापीठांनी स्वतःच शिक्षण देण्यापेक्षा इतरत्र दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची परीक्षांच्या रूपाने चाचणी घेण्याचे काम करावे. परंतु पुढे असेही नमूद केले आहे की, विविध ज्ञानशाखात अध्यापन करण्यासाठी विद्यापीठांनी स्वतःची विद्यासने (Professorships) निर्माण करावी. परंतु १८५७ साली विद्यापीठांची स्थापना करण्यासाठी जे कायदे करण्यात आले त्यानुसार मात्र परीक्षा घेणे आणि पदव्या देणे यापुरतेच विद्यापीठांचे कार्य मर्यादित करण्यात आले. परिणामतः संशोधनाने उपलब्ध ज्ञानात भर घालणे आणि स्वतःच्या प्राध्यापकांकडून विद्यादानाचे काम करवून घेऊन ज्ञानाचा कस वाढविणे, ही जी विद्यापीठाची महत्त्वाची कामे आहेत ती संपूर्णपणे दुर्लक्षिली गेली. ही शोचनीय परिस्थिती महाराष्ट्रापुरते बोलावयाचे तर जवळजवळ नव्वद वर्षे टिकली.

चालू शतकाच्या सुरुवातीस लॉर्ड कर्झन यांनी शैक्षणिक सुधारणांचा उपक्रम हाती घेतला. १८५७ मध्ये विद्यापीठांची स्थापना झाल्यानंतर एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत संलग्न महाविद्यालयांची संख्या बरीच वाढली होती. ही वाढ १८८२ नंतरच्या काळात विशेष झाली होती. उच्च शिक्षणाचा हा विस्तार अनिष्ट असून त्यामुळे गुणवत्ता खालावली आहे असे म्हणणारा एक पक्ष होता. शिक्षणाच्या क्षेत्रात खाजगी प्रयत्नांना उत्तेजन देण्याचे जे सरकारचे धोरण होते, त्यामुळे अस्तित्वात आलेली

बरीचशी महाविद्यालये अशी होती की ज्यात पुरेसे प्राध्यापक नव्हते, विद्यार्थ्यांच्या अडचणींकडे वैयक्तिक लक्ष पुरविण्याची सोय नव्हती, आणि दैनंदिन जीवनात उपयोगी पडतील असे नवेनवे अभ्यासक्रम शिकविण्याची तरतूद नव्हती. परिणामतः ही महाविद्यालये म्हणजे विद्यादानाची केंद्रे नसून केवळपरीक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची तयारी करून देण्याचे " कोचिंग क्लास " होते !

या उलट उच्च शिक्षणाच्या वाढीच्या आरंभीच्या काळात गुणवत्तेइतकेच विस्तारालाही महत्त्व आहे. उच्च शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही, असे प्रतिपादन करणाऱ्यांचाही एक पक्ष होता आणि त्याचे नेतृत्व कै. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी केले. त्यांनी आपले मत पुढील शब्दात व्यक्त केले आहे :

" Let not Government imagine that unless the education imparted by colleges is the highest which is possible, it is likely to prove useless, and secondly, let not the achievements of our graduates in the intellectual field be accepted as the sole test to determine the utility of this education. Even if it is not the highest, it must not on that account be rejected. The greatest work of Western education in the present state of India is not so much the encouragement of learning, as the liberation of the Indian mind from the thraldom of old-world ideas, and the assimilation of all that is highest and best in the life and thought and character of the West."

" सध्या महाविद्यालयातून दिले जाणारे शिक्षण जर सर्वोच्च प्रतीचे नसेल, तर ते निरुपयोगी ठरेल असे सरकारने मानू नये. आमच्या पदवीधरांनी बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात मिळविलेले यश हे उच्च शिक्षणाच्या उपयुक्ततेचे एकमेव गमक समजण्यात येऊ नये. ते सर्वोच्च प्रतीचे नसले, तरी ते नाकारता येणार नाही. पाश्चात्य शिक्षणाचे मुख्य कार्य केवळ विद्वत्तेला उत्तेजन देणे हे नसून भारतीयांना जुन्या कल्पनांच्या बंधनातून मुक्त करणे, आणि पश्चिमेकडील जीवनात, विचारात आणि चारित्र्यात जे उत्तमोत्तम असेल त्याची त्यांना ओळख करून देणे हे आहे. "

यावरून विस्तार की गुणवत्ता हा प्रश्न शिक्षणाच्या क्षेत्रात अलीकडेच निर्माण झालेला नसून तो सत्तर वर्षापूर्वीही अस्तित्वात होता हे दिसून येईल.

भारतीय विद्यापीठांच्या सुधारणेचा प्रश्न गेल्या शतकाच्या अखेरीस चर्चिला जात होता. उच्च शिक्षण देण्यासाठी १८५७ साली जी यंत्रणा उभारली होती, तिच्यावर १८८२

त्यानंतर महाविद्यालयांच्या व माध्यमिक शाळांच्या संख्येत जी झपाट्याने वाढ झाली होती, त्यामुळे बराच ताण पडला होता. शिवाय खुद्द इंग्लंडमध्ये, ज्या लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर भारतीय विद्यापीठांची रचना करण्यात आली होती, त्या लंडन विद्यापीठाचीच सुधारणा करण्याची जरुरी भासू लागली होती. विद्यापीठाने स्वतः शिक्षणाचे काम केले पाहिजे. नुसत्या परीक्षा घेऊन भागणार नाही, हा विचार बळावत चालला होता. १८९८ साली पार्लमेंटच्या कायद्याने लंडन विद्यापीठाचे प्रत्यक्ष शिक्षण देणाऱ्या विद्यापीठात रूपांतर करण्यात आले. म्हणून भारतीय विद्यापीठांच्या सुधारणेचा सर्वांगीण विचार करण्यासाठी १९०२ साली एक कमिशन नेमण्यात आले. या कमिशनपुढे भारतीय विद्यापीठांची रचना कशा तऱ्हेची असावी असा मूलभूत प्रश्न विचारार्थ होता. परंतु दुर्दैवाने या प्रश्नाची चर्चा कमिशनने आपल्या अहवालात केली नाही. महाविद्यालये संलग्न करून घेण्याच्या ज्या पायावर भारतीय विद्यापीठांची रचना झाली होती त्याच्यात काही मूलगामी बदल करून विद्यापीठांची पुनर्रचना करणे कमिशनला जरुरीचे वाटले नाही. कमिशनने केलेल्या शिफारशीत पुढील पाच विषयांचा समावेश झालेला होता :—

( १ ) विद्यापीठांच्या शासन व्यवस्थेची पुनर्रचना.

( २ ) विद्यापीठांची संलग्न महाविद्यालयांवर जास्त परिणामकारक देखरेख आणि संलग्नीकरणाच्या अटींतील शैथिल्य नाहीसे करणे.

( ३ ) विद्यार्थ्यांनी ज्या परिस्थितीत राहावे लागते आणि अभ्यास करावा लागतो तिकडे जास्त लक्ष देणे.

( ४ ) काही विशिष्ट मर्यादेत विद्यापीठाने स्वतः शिक्षणाची जबाबदारी घेणे. आणि

( ५ ) अभ्यासक्रमात आणि परीक्षा–पद्धतीत बदल करणे.

यांपैकी क्रमांक ( ३ ) व ( ५ ) या बाबी साहजिकच विद्यापीठांवर सोपविण्यात आल्या व बाकीच्या तीन बाबींचा अंतर्भाव मात्र १९०४ साली संमत झालेल्या भारतीय विद्यापीठांच्या कायद्यात करण्यात आला. या कायद्यामुळे विद्यापीठांच्या कार्यक्षेत्राचा विस्तार झाला. सिनेटमधील सभासदांच्या संख्येवर मर्यादा घालण्यात आली. मुंबई विद्यापीठातील फेलोंची संख्या १९०२ साली २९६ होती. हे सर्व सिनेटचे सभासद असत. यावरून हे करणे किती अवश्य होते हे स्पष्ट होईल. याशिवाय सिनेटचे काही सभासद निरनिराळ्या मतदारसंघांतून निवडून यावे अशी तरतूद करण्यात आली. विद्यापीठाचा दैनंदिन कारभार पाहणारे अधिकार–मंडळ जे सिंडिकेट त्याला कायद्याचे अधिष्ठान देण्यात आले आणि त्यावर काही प्रमाणात शिक्षकांचे प्रतिनिधी निवडून यावे अशीही तरतूद करण्यात आली. संलग्न महाविद्यालयांची प्रत्यक्ष पाहणी वेळोवेळी

करण्याचे अधिकार सिंडिकेटला देण्यात आले, आणि संलग्नीकरणाबाबतच्या नियमांचा कायद्यात समावेश झाला. याबाबतच्या १९०४ मधल्या कायद्यातील तरतुदी आजही बव्हंशी सर्व विद्यापीठांच्या कायद्यात आहेत. त्या वेळच्या कायद्याचा एक विशेष म्हणजे सिनेटने केलेल्या रेग्युलेशन्समध्ये फेरफार करण्याचा आणि काही विशिष्ट कालमर्यादेत सिनेटने रेग्युलेशन्स केली नाहीत, तर ती स्वतःच करण्याचा अधिकार सरकारने राखून ठेवला.

१९०४ च्या कायद्यातील तरतुदीमुळे त्या वेळी लोकमत बरेच प्रक्षुब्ध झाले होते. कै. गोपाळराव गोखले यांनी इंपीरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये प्रखर विरोध केला. लोकमत विद्यापीठांची सुधारणा करण्यास प्रतिकूल नव्हते. परंतु सरकारच्या हेतूविषयी मात्र साशंक होते. आज मात्र असा निष्कर्ष काढता येतो की, या कायद्यामुळे भारतीय विद्यापीठांच्या फक्त शासनव्यवस्थेत सुधारणा झाली. उच्च शिक्षणाची पुनर्रचना त्यामुळे झाली नाही. आणि ज्यांची खरोखर आवश्यकता होती अशा नव्या विद्यापीठांची निर्मितीही झाली नाही. शिवाय विद्यापीठांच्या शासनव्यवस्थेत सरकारला वाजवीपेक्षा जास्त अधिकार देण्यात आले.

या पुढचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९४७ साली स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यानंतर लवकरच म्हणजे १९४८ सालच्या अखेरीस झालेली विद्यापीठ शिक्षण आयोगाची, म्हणजे युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशनची, स्थापना हा होय. या कमिशनचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् हे होते. या कमिशनच्या अहवालाच्या दुसऱ्या प्रकरणात विद्यापीठीय शिक्षणाच्या उद्दिष्टांची सविस्तर चर्चा केली आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून स्वराज्यप्राप्तीपर्यंतच्या काळात उच्च शिक्षणाचा बराच विस्तार झाला होता. केवळ महाविद्यालये संलग्न करून घेणाऱ्या विद्यापीठांखेरीज सर्व उच्च शिक्षणाची स्वतः जबाबदारी घेणाऱ्या काही फेडरल आणि युनिटरी स्वरूपाच्या विद्यापीठांची स्थापना झाली होती. परंतु उच्च शिक्षणाचे एकंदर चित्र मात्र फारसे आशादायक नव्हते. उच्च शिक्षणाची गुणवत्ता खालवत चालली असल्याचे दिसत होते व काही विद्यापीठांच्या शासनव्यवस्थेतही गंभीर दोष उत्पन्न झाले होते. ज्ञानाच्या सर्व शाखांत उत्तम शिक्षणाची व्यवस्था करणे, संशोधनाने उपलब्ध ज्ञानात भर घालणे, विद्यार्थ्यांचे चारित्र्य घडविणे ही उच्च शिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्टे झाली. त्यांचे महत्त्व सर्वत्र आणि सर्वकाळ राहणार आहे. परंतु १९४७ नंतर नवसमाज-निर्मितीचे जे आव्हान भारतीय जनतेपुढे आले होते, त्या संदर्भात कोणती खंबीर तात्त्विक भूमिका स्वीकारली पाहिजे, कोणत्या मूल्यांची जपणूक केली पाहिजे, विद्यापीठांच्या शासनव्यवस्थेत निर्माण झालेल्या दोषांचे निराकरण करण्यासाठी कोणती उपाययोजना केली पाहिजे, याबाबत राधाकृष्ण आयोगाने कोणते मार्गदर्शन केले आहे, ते आता थोडक्यात पाहावयाचे आहे.

कोणत्या तऱ्हेची समाजरचना आपणास हवी आहे याची स्पष्ट कल्पना आपणास असावयाला पाहिजे असे म्हणून राधाकृष्णन् आयोगाने असे सांगितले आहे की, आपल्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा आराखडा भारताच्या घटनेत अंतर्भूत केलेल्या तत्त्वांत दिसेल. आम्हाला लोकशाही पद्धतीचे सार्वभौम राज्य प्रस्थापित करावयाचे असून त्याची मार्गदर्शक तत्त्वे न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही असतील. या तत्त्वांच्या पायावर आपले शिक्षणविषयक तत्त्वज्ञान आधारले असले पाहिजे. तेव्हा लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या पाच मूलभूत तत्त्वांना अनुसरून राधाकृष्णन् आयोगाने जे प्रतिपादन केले आहे त्याचा थोडक्यात गोषवारा असा—

## १. लोकशाही

व्यक्तीचे महत्त्व मान्य करणे हा लोकशाहीचा पाया आहे. व्यक्ती हा समुदायाचा केवळ एक अंश आहे, ही हुकुमशाही विचारसरणी लोकशाहीला मान्य नाही. सर्वच व्यक्ती एका साच्याच्या असू शकत नाही. काही बुद्धिमान असतात, काही भावनाशील असतात आणि काही क्रियाशील असतात. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या अंगभूत प्रवृत्तीप्रमाणे व मगदुराप्रमाणे शिक्षण देण्याची व्यवस्था झाली पाहिजे. जीवन हे नैसर्गिक, सामुदायिक व आत्मिक अशा तीन प्रकारचे असते आणि हे तीनही प्रकार परस्परावलंबी आहेत. म्हणून शिक्षणाचे तीन विभाग पाडता येतील : आपला निसर्गाशी संबंध, समुदायाशी संबंध आणि चिरंतन मूल्यांशी संबंध. पहिल्या विभागात विज्ञानाच्या निरनिराळ्या शाखा व तंत्रज्ञान ( Technology ) यांचा अंतर्भाव होतो. दुसऱ्यात इतिहास, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र इत्यादींचा आणि तिसऱ्यात भाषा व वाङ्मय यांचा व संगीतादी कलांचा. स्वतंत्र व्यक्तींचा स्वतंत्र समाज म्हणजे केवळ बाह्य निर्बंधापासून मुक्त असलेला समाज नव्हे. खरे स्वातंत्र्य म्हणजे खरे आणि खोटे, चांगले आणि वाईट यात निवड करण्याचे स्वातंत्र्य. ही निवड कित्येक वेळा चुकीचीही होईल. परंतु खऱ्या लोकशाहीत जनतेला चुकीचे निर्णय घेण्याचेही स्वातंत्र्य असते.

## २. न्याय

सामाजिक न्याय हे राज्याचे अधिष्ठान आहे. आज दिले जाणारे शिक्षण देशाच्या विविध गरजा पुऱ्या करू शकत नाही. कला आणि विधि शास्त्रांतले पदवीधर आपण पुष्कळ निर्माण करतो, परंतु पुरेसे शिक्षक, प्रशासक, डॉक्टर, इंजिनियर व शास्त्रज्ञ नाही. शेतीविषयक शिक्षणाकडेही आपण पुरेसे लक्ष दिलेले नाही. मानवाच्या सामाजिक विकासासाठी यंत्राचा उपयोग केला पाहिजे. निरनिराळ्या व्यवसायात आणि सामाजिक जीवनात हवे असलेले नेतृत्व पुरविणे हे विद्यापीठांचे काम आहे. परंतु ते करणे सोपे

नाही. चारित्र्य घडविणे हेही महत्त्वाचे कार्य उच्च शिक्षणाला करावयाचे आहे.

### ३. स्वातंत्र्य

व्यक्तिस्वातंत्र्य हा लोकशाहीचा पाया आहे. म्हणून उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था राज्यांच्या नियंत्रणाखाली असता कामा नयेत. विवाद्य विषयांवरील आपले विचार व्यक्त करणे शिक्षकांना शक्य झाले पाहिजे. आपली विद्यापीठे राजकीय दडपणापासून मुक्त झाली पाहिजेत.

### ४. समता

लोकशाही राज्यात सर्व नागरिकांना समान हक्क असतात. ते धर्म, जाती, सामाजिक प्रतिष्ठा इत्यादींवर अवलंबून नसतात. ही समता प्रस्थापित करण्यासाठी शिक्षणास महत्त्वाचे कार्य करावयाचे आहे. परंतु समान संधी म्हणजे एकाच प्रकारची संधी नव्हे. लोकशाही राज्यात आपापल्या पात्रतेप्रमाणे शिक्षण घेण्याची संधी मिळाली पाहिजे. समान संधीचे तत्त्व जर अमलात आणावयाचे असेल तर केवळ आर्थिक कारणासाठी शिक्षणापासून कोणीही वंचित होता कामा नये. मद्रास राज्यातील एका सरकारी स्थापत्य महाविद्यालयात उपलब्ध जागांची वाटणी जातवार करण्यात आली आहे. हे घटनेत नमूद केलेल्या मूलभूत हक्कांशी विसंगत आहे. मागासलेल्या वर्गासाठी मात्र काही प्रमाणात जागा राखून ठेवण्यास हरकत नाही. मात्र अशा राखीव जागांचे प्रमाण एकूण जागांच्या एकतृतीयांशापेक्षा अधिक असू नये आणि हे तत्त्व दहा वर्षांपुरतेच स्वीकारावे.

### ५. बंधुता : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही पातळ्यांवर बंधुता प्रस्थापित करणे जरूर आहे. आपल्या महाविद्यालयीन व विद्यापीठीय जीवनात सांघिक, सामुदायिक जीवनाला पुरेसे स्थान नाही. अलीकडील काही वर्षांत जनतेचे नैतिक अधःपतन झाले आहे. सत्तास्थानांवर असलेल्या बऱ्याच जणांना अभिलाषा, स्वार्थ आणि द्वेष या दुर्गुणांनी ग्रासले आहे. विद्यापीठांनी स्वतःच्या वर्तणुकीने सौजन्य व न्याय यांचे आदर्श समाजापुढे ठेवले पाहिजेत, परंतु दुर्दैवाने बऱ्याच विद्यापीठांत तशी परिस्थिती नाही. कारखान्यांना आणि उद्यापतींना कमी वाव मिळेल अशी केवळ यंत्रणा उभारून भागणार नाही, तर विद्यापीठात काम करणाऱ्या लोकांत सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होणे जरूर आहे. निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांचे अनेक प्रांत मिळून भारत देश बनला. आपल्या लोकांत आचार–विचारांची भिन्नता आहे. परंतु या विषमतेत सर्व

नागरिकांना एकत्र बांधणारी एक मूलभूत एकता आहे. हे ऐक्य विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवून देशाच्या विविध भागांत बंधुत्वाची भावना निर्माण करणे हे विद्यापीठांचे काम आहे. जागतिक शांततेसाठीसुद्धा विद्यापीठांना महत्त्वाचे कार्य करता येण्यासारखे आहे. खऱ्या अर्थाने सुसंस्कृत समाज अजून निर्माण झालेला नाही. अशा सुसंस्कृत समाजाची निर्मिती केवळ राष्ट्रीयत्वाच्या पायावर होणार नाही. खरा सुसंस्कृत माणूस हा जगाचा नागरिक आहे.

आपल्या दूरदृष्टीच्या घटनाकारांनी भारतीय राज्यव्यवस्थेची मूलभूत तत्त्वे ठरवून दिलेली आहेत. ही जर अमलात आणावयाची असतील तर आपल्या विद्यापीठांनी योग्य तऱ्हेचे शिक्षण जास्त जास्त नागरिकांना उपलब्ध करून दिले पाहिजे. ''

कोणत्या तऱ्हेची समाजरचना आपणास अभिप्रेत आहे याबद्दलच्या कल्पना स्पष्ट आणि निश्चित असावयास हव्यात असे सांगून राधाकृष्णन् आयोगाने एक प्रकारे वैचारिक प्रगतीच केली आहे. परंतु प्रत्यक्षात जी विचारसरणी मांडली आहे ती मात्र अत्यंत ढोबळ आणि सर्वसामान्य स्वरूपाची, आणि पक्केपणाचा आणि धारदारपणाचा संपूर्ण अभाव असलेली अशी आहे हे आताच सांगितलेल्या गोषवाऱ्यावरून दिसून येईल. याचे कारण उघड आहे. १९४८ साली नुकत्याच सत्तेवर आलेल्या पक्षातच विविध आर्थिक, राजकीय आणि सामाजिक प्रश्नांबाबत विचारांचा ठामपणा नव्हता. पक्षाचे स्वरूप सर्वसंग्राहक असून त्यात भिन्न आणि परस्परविरोधी विचारसरणींची माणसे होती. कवी बोरकरांच्या शब्दात सांगायचे म्हणजे मार्क्सचा अर्थ हवा, फ्रॉईडचा काम हवा आणि त्याचबरोबर गांधीजींचा रामही हवा असे म्हणणारी मंडळी सत्तेवर होती. या वैचारिक भोंगळपणाचे प्रतिबिंब राधाकृष्णन् आयोगाने विद्यापीठीय शिक्षणाच्या उद्दिष्टांची जी चर्चा केली आहे तिच्यात दिसून येते.

आता शेवटी आपल्याला १९६६ साली प्रसिद्ध झालेल्या कोठारी आयोगाच्या अहवालात कोणती विचारसरणी मांडली आहे ते थोडक्यात पाहावयाचे आहे.

शिक्षणाच्या पुनर्रचनेबाबत आयोगाने ज्या विविध सूचना केल्या आहेत त्यांचे स्थूलमानाने पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल—

( १ ) शिक्षणव्यवस्थेत अंतर्गत सुधारणा करून शिक्षणाची जीवनाशी आणि देशाच्या गरजा आणि आकांक्षा यांच्याशी सांगड घालणे.

( २ ) शिक्षणाचा दर्जा पुरेशा उंच पातळीवर राहील, तो सारखा वाढत राहील आणि निदान काही क्षेत्रांत तरी आंतरराष्ट्रीय मान्यता मिळण्याइतपत उंचावेल यासाठी शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे.

आणि ( ३ ) देशाला लागणारे मनुष्यबळ लक्षात घेऊन शिक्षणाच्या सोयींत अशा रीतीने वाढ करणे की, शिक्षणाची समान संधी सर्वांना मिळू शकेल.

विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या पायावर उभ्या असलेल्या आधुनिक जगात देशाची समृद्धी, कल्याण आणि सुरक्षितता शिक्षणावरच ठरणार आहे. शिक्षणाचा विचार केवळ साध्य म्हणून अलिप्तपणे करता येणार नाही. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र म्हणून त्याचा उपयोग केला पाहिजे आणि म्हणून ते राष्ट्रीय आशा-आकांक्षांशी, आणि राष्ट्रविकासाच्या कार्यक्रमांशी निगडित असले पाहिजे.

इतक्या प्रास्ताविकानंतर अहवालाच्या अकराव्या प्रकरणात उच्च शिक्षणाच्या उद्दिष्टांबाबत विवेचन केले आहे. त्याचा सारांश पुढे देत आहे—

" विद्यापीठांनी जपणूक करावयाची मूल्ये जरी चिरंतन असली, तरी त्यांनी प्रत्यक्ष करावयाचे कार्य वेळेनुसार बदलते. झपाट्याने बदलत असलेल्या सद्यः परिस्थितीत विद्यापीठांचे कार्य ज्ञानाचा प्रसार करणे आणि उपलब्ध ज्ञानात भर घालणे एवढ्या-पुरतेच मर्यादित राहणार नाही. स्थूलमानाने आधुनिक जगात विद्यापीठांनी पुढील कामे केली पाहिजेत असे म्हणता येईल—

( १ ) सत्याच्या निर्भय शोधात नव्या ज्ञानाचा शोध घेणे, त्याची जोपासना करणे आणि जुने ज्ञान आणि समजुती यांची नव्या ज्ञानाच्या प्रकाशात तपासणी करणे.

( २ ) जीवनाच्या सर्व क्षेत्रात योग्य तऱ्हेचे नेतृत्व पुरविणे व बुद्धिमान आणि गुणी तरुणांचा शोध घेऊन त्यांच्या व्यक्तित्वाच्या विकासास सर्व प्रकारे मदत करणे.

( ३ ) ज्यांना कृषी, कला, विज्ञान, वैद्यक इत्यादी ज्ञानशाखांत प्राविण्य मिळविले आहे, आणि ज्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव आहे, अशा तरुणांचा आणि तरुणींचा समाजास पुरवठा करणे.

( ४ ) समता व सामाजिक न्याय यांची जोपासना करणे आणि ज्ञानाच्या पसाराने सामाजिक आणि सांस्कृतिक फरक कमी करण्याचा प्रयत्न करणे.

( ५ ) चांगल्या जीवनाची म्हणजे इंग्रजीत ज्याला " गुड लाईफ " म्हणतात त्याची वाढ करण्यासाठी ज्या मूल्यांची व जीवनविषयक दृष्टिकोणाची जरुरी आहे त्यांची शिक्षकांत आणि विद्यार्थ्यांत आणि त्यांच्यातर्फे समाजात जोपासना करणे.

उच्च शिक्षणाची ही सर्वसामान्य उद्दिष्टे सर्वच विद्यापीठांना लागू आहेत. परंतु सध्याच्या सामाजिक परिस्थितीत भारतीय विद्यापीठांच्या काही खास जबाबदाऱ्या आहेत. त्यातली पहिली आणि सर्वांत महत्त्वाची म्हणजे त्यांनी देशाची " सदसद्-विवेकबुद्धी " ( कॉन्शन्स ऑफ द नेशन ) म्हणून काम केले पाहिजे. देशात प्रबुद्ध लोकमताचा म्हणजे " एन्लायटन्ड पब्लिक ओपिनियन "चा अभाव असल्यामुळे ही जबाबदारी विशेष महत्त्वाची आहे. या दृष्टिकोणातून पाहिले तर विद्यापीठांनी व्यक्ति-वैशिष्ट्य, विविधता आणि विरोध ( Individuality, Variety and Dissent )

यांना उत्तेजन दिले पाहिजे. काही प्रमाणात विरोध आजही आहे, परंतु बव्हंशी तो वरवरचा किंवा भडकपणाचा आणि आततायीपणाचा आहे. सर्वसामान्य प्रवृत्ती प्रस्थापिताचा स्वीकार करण्याची आणि सत्तेवर असणाऱ्यांच्यापुढे लांगूलचालन करून सवलती मिळविण्याचीच आहे. विद्यापीठांनी असल्या प्रवृत्तीपासून अलिप्त राहिले पाहिजे. **त्यांचे कार्य समाजाला जे हवे आहे ते देण्याचे नसून जे समाजाच्या हिताचे आहे ते करण्याचे आहे.**"

कोठारी आयोगाने विद्यापीठीय शिक्षणाच्या उद्दिष्टांविषयी केलेल्या चर्चेचा हा जो थोडक्यात सारांश सांगितला त्यावरून असे दिसून येईल की, ती राधाकृष्णन् आयोगाने केलेल्या चर्चेपेक्षा बरीच वस्तुनिष्ठ, परस्परविरोधी तत्त्वांच्या एकाच वेळी केलेल्या पुरस्कारापासून मुक्त, आणि केवळ शब्दांच्या आतषबाजीपासून पुष्कळशी अलिप्त आहे. भारतीय विद्यापीठांना जडलेल्या रोगांचे निदान कोठारी अयोगाने अचूकपणे केलेले आहे, परंतु दुर्दैवाने जी उपाययोजना सुचविली आहे ती मात्र समाधानकारक नाही. विद्यापीठांचा दर्जा सुधारण्यासाठी "मेजर युनिव्हर्सिटीज"ची स्थापना करावी ही जी सूचना आहे ती तर सर्वस्वी अव्यवहार्यच नव्हे तर प्रतिगामी स्वरूपाची आहे. त्याबद्दल गुणवत्तेच्या संदर्भात मी जास्त विवेचन करणार आहे, परंतु सूचनेचा आशय असा की, उच्च स्तरावर सर्व साधने व सोयी केंद्रित कराव्या म्हणजे केव्हातरी ज्ञानगंगा झिरपत झिरपत खालच्या स्तरापर्यंत येईल! ज्या झिरपण्याच्या सिद्धांताचा, म्हणजे "परकोलेशन थियरी"चा अव्हेर वूडच्या डिस्पॅचमध्ये १८५४ साली केलेला आहे, त्याचा पाठपुरावा १९६६ साली कोठारी आयोगाने करावा हे अत्यंत शोचनीय आहे. त्याचप्रमाणे शिक्षणाचा विस्तार देशाला लागणाऱ्या मनुष्यबळाचा विचार करून करावा ही कोठारी आयोगाची सूचना अशास्त्रीय आहे एवढेच नव्हे, तर तिचा स्वीकार केल्यास समाजातील दुर्बल घटकांवर अन्याय होण्याचा कसा संभव आहे, हे कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी पुणे विद्यापीठाच्या एका दीक्षांत समारंभाच्या प्रसंगी केलेल्या भाषणात स्पष्ट केलेले आहे. १९६६ सालीही सामाजिक उद्दिष्टांबाबत आपल्या कल्पना ठाम तात्त्विक भूमिकेवर आधारलेल्या नव्हत्या याचेच हे द्योतक आहे.

विद्यापीठांनी बुद्धीच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवला पाहिजे आणि तो विश्वास इतरांतही निर्माण केला पाहिजे असे कोठारी आयोगाने म्हटले आहे. परंतु बुद्धिप्रामाण्यवादाचा पुरेसा जोरदार पुरस्कार केला नाही. आज समाजवाद हा परवलीचा शब्द झालेला आहे. परंतु समाजवाद ही एक बुद्धिप्रामाण्यवादी आणि तर्कनिष्ठ विचारसरणी आहे हे सोयिस्करपणे विसरले जाते. तिच्यात अंतःप्रेरणेला किंवा "आतल्या आवाजा"ला स्थान नाही, भावड्या भावुकपणाला नाही, आणि व्यक्तिपूजेला तर मुळीच

नाही. बुद्धीच्या सामर्थ्यावर जर विद्यापीठांना खरोखरच विश्वास असेल, आणि तसा तो असावयास पाहिजे, तर त्यांनी अंतःप्रेरणेला आणि तिच्या आश्रयाने येणाऱ्या नाना तऱ्हेच्या अंधश्रद्धांना सक्त विरोध केला पाहिजे, कोणत्याही तऱ्हेच्या आणि कोणत्याही स्तरावर व्यक्तिपूजेला उत्तेजन देता कामा नये, आणि विद्यार्थ्यांत आणि समाजात बुद्धिप्रामाण्यवाद रुजविला पाहिजे.

# व्याख्यान दुसरे

## शैक्षणिक समस्या

आता काही शैक्षणिक समस्यांची चर्चा करावयाची आहे. प्रथम पदवी शिक्षणाचा आणि पदव्युत्तर शिक्षणाचा दर्जा वाढविणे, प्राध्यापकांची पात्रता सुधारणे, परीक्षा-पद्धतीतील दोष नाहीसे करणे, उच्च शिक्षणाच्या माध्यमाविषयी निश्चित धोरण ठरविणे अशा या समस्या आहेत. त्या नव्यानेच निर्माण झाल्या आहेत असे नव्हे. त्यांची तात्त्विक चर्चाही आतापर्यंत पुष्कळ झाली आहे. तेव्हा केवळ उच्च तत्त्वांचा पुनरुच्चार न करता प्रत्यक्ष अनुभवाच्या पार्श्वभूमीवर विवेचन करून काही निष्कर्ष काढता येतात का ते पाहावयाचे आहे.

शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी करण्यात आलेली एखादी सूचना, राजकीय किंवा सामाजिक कारणासाठी स्वीकारता येत नसेल तर कशा विपर्यस्त स्वरूपात अमलात आणली जाते याचे उत्तम उदाहरण म्हणजे तीन वर्षांचा बी. ए. किंवा बी. एस्सी.-सारख्या पहिल्या पदवीचा अभ्यासक्रम. पूर्वी हा अभ्यासक्रम इंटरच्या परीक्षेनंतर दोन वर्षांचा होता. तो तीन वर्षांचा करावा अशी सूचना राधाकृष्णन् आयोगाने आपल्या १९४८ च्या अहवालात केली. वास्तविक ही सूचना नवी नव्हती. १९१६ साली कलकत्ता विद्यापीठाने सर अशुतोष मुकर्जी यांच्या नेतृत्वाखाली पदव्युत्तर शिक्षणाची जबाबदारी स्वतःकडे घेण्याचे ठरविले आणि त्या कामासाठी बऱ्याच प्राध्यापकांची नेमणूक केली. याच सुमारास मध्यवर्ती सरकारने कलकत्ता विद्यापीठापुढे असलेल्या प्रश्नांची सर्वांगीण चौकशी करण्यासाठी एक कमिशन नेमले. त्याच्या १९१९ साली प्रसिद्ध झालेल्या अहवालात इंटरपर्यंतचा शिक्षणक्रम शाळांच्याकडे सोपवावा आणि

त्यानंतरचा पहिल्या पदवीचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा करावा अशी शिफारस केलेली आहे. त्याच शिफारशीचा पुनरुच्चार राधाकृष्णन् आयोगाने केलेला आहे. प्रथम पदवीची परीक्षा देईपर्यंत विद्यार्थ्याला शाळेत आणि महाविद्यालयात किंवा विद्यापीठात किती वर्षे अध्ययन करावे लागते ते दर्शविणारा भारत, इंग्लंड आणि अमेरिका येथील परिस्थिती-बाबत एक तुलनात्मक तक्ता राधाकृष्ण आयोगाने दिला आहे. त्यात असे दाखविले आहे की, भारतात सामान्यतः पहिल्या पदवीपर्यंतचा अध्ययनकाल एकूण १४ वर्षांचा असतो—मॅट्रिकपर्यंत दहा आणि नंतर चार. याउलट इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये तो एकूण सोळा वर्षांचा असतो. इंग्लंडमध्ये इंटरपर्यंतच्या दर्जाचे शाळेत १३ वर्षांचे शिक्षण आणि नंतर तीन वर्षे विद्यापीठात. अमेरिकेत शालेय शिक्षण एकूण बारा वर्षे आणि नंतर विद्यापीठात चार वर्षे. म्हणून भारतातील पहिल्या पदवीच्या शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी, आणि तो इंग्लंड आणि अमेरिका येथील पहिल्या पदवीच्या पातळीच्या जास्त जवळ आणण्यासाठी, तो शिक्षणक्रम एकूण १४ ऐवजी १५ वर्षांचा करावा, म्हणजेच पूर्वीचा इंटरनंतरचा दोन वर्षांचा शिक्षणक्रम तीन वर्षांचा करावा, असे राधाकृष्णन् आयोगाने सुचविले. इथे स्पष्ट करणे आवश्य आहे की, पश्चिम महाराष्ट्रात, म्हणजे पूर्वीच्या मुंबई राज्यात, मॅट्रिकची किंवा एस्. एस्. सी. ची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी शाळेत अकरा वर्षे अभ्यास करावा लागे. त्यानंतर विद्यापीठाचा चार वर्षांचा पदवीचा अभ्यासक्रम. म्हणजे पूर्वीच्या मुंबई राज्यातील विद्यार्थ्यांना पहिली पदवी मिळेपर्यंत एकूण पंधरा वर्षेच अभ्यास करावा लागत असे. आजही या परिस्थितीत बदल झालेला नाही. भारतात इतरत्र मात्र ही परिस्थिती नव्हती. आजही विदर्भात आणि मराठवाड्यात पहिली पदवी मिळविण्यापूर्वी फक्त चौदा वर्षेच अध्ययन करावे लागते : एस्. एस्. सी. पर्यंत दहा वर्षे आणि नंतर महाविद्यालयात चार वर्षे. किंवा हायर सेकंडरी स्कूल परीक्षेपर्यंत अकरा वर्षे आणि नंतर महाविद्यालयात तीन वर्षे.

इंटर परीक्षेनंतरचा प्रथम पदवीचा अभ्यासक्रम दोनच्या ऐवजी तीन वर्षांचा करावा ही राधाकृष्णन् आयोगाची शिफारस प्रथम "सेंट्रल ॲडव्हायसरी बोर्ड ऑफ एज्युकेशन" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या केंद्र सरकारच्या समितीपुढे आली. निरनिराळ्या राज्यांचे शिक्षणमंत्री आणि शिक्षण-संचालक, आणि विद्यापीठांचेही काही प्रतिनिधी, या समितीवर असतात. ज्या राज्यात मॅट्रिक किंवा एस्. एस्. सी. चा शिक्षणक्रम केवळ दहाच वर्षांचा होता ती राज्ये राधाकृष्णन् आयोगाची शिफारस मान्य करीनात. म्हणून इंटरपर्यंतची दोन वर्षे आणि त्यानंतरची बी. ए. किंवा बी. एस्सी. पर्यंतची दोन वर्षे अशी जी महाविद्यालयातील शिक्षणक्रमाची विभागणी होती, त्याऐवजी एस्. एस्. सी. नंतर एक वर्षाचा पदवीपूर्व शिक्षणक्रम आणि तीन वर्षांचा पदवीचा अभ्यासक्रम अशी विभागणी तडजोड म्हणून करण्याचे ठरले. म्हणजे दोन अधिक

दोनच्या ऐवजी एक अधिक तीन असा केवळ अंकगणिती बदल करण्यात आला. त्याचा अर्थातच गुणवत्तेशी किंवा पदवीपरीक्षेचा दर्जा सुधारण्याशी कसलाही संबंध नव्हता.

यात सुमारास विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना झाली. विद्यापीठीय शिक्षणाचा दर्जा वाढविणे आणि त्यासाठी विद्यापीठांना आर्थिक साहाय्य करणे ही आयोगाची कायदेशीर जबाबदारी आहे. विद्यापीठांना तीन वर्षांचा पदवीचा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी किती आर्थिक मदत लागेल याचा विचार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या एका समितीने केला. आयोगाचे पहिले अध्यक्ष डॉ. चिंतामणराव देशमुख या समितीचेही अध्यक्ष होते. या समितीने महाविद्यालयांची वर्गवारी करून ग्रंथालये सुधारण्यासाठी, प्रयोगशाळांत जास्त सोयी उपलब्ध करण्यासाठी, जादा वर्ग बांधण्यासाठी आणि जादा शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी किती खर्च येईल याचा ढोबळ अंदाज करून काही शिफारशी केल्या. आताच स्पष्ट केल्याप्रमाणे राधाकृष्णन् आयोगाची मूळ सूचना अत्यंत भ्रष्ट व विपर्यस्त स्वरूपात स्वीकारली गेली. ती दत्तक घेण्याचे नव्याने प्रस्थापित झालेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाला काहीच कारण नव्हते. आयोगाने याबाबत एवढीच अट घातली की, प्रथम पदवी शिक्षणाचा आहे तो दर्जा तरी निदान कायम ठेवावा! परंतु तीही पाळली गेली नाही. पूर्वीच्या अभ्यासक्रमात इंटरचे सात आणि बी. ए. ऑनर्सचे अकरा, असे तीन वर्षांत प्रत्येकी शंभर गुणांचे अठरा " पेपर्स " शिकविले जात. नव्या तीन वर्षांच्या अभ्यासक्रमात या " पेपर्स "ची संख्या फक्त सोळाच आहे. " पेपर्स "ची संख्या कमी केली तरी जवळजवळ पूर्वीइतकेच विषय व पोटविषय शिकविले जातात असा दावा काही प्राध्यापकांकडून केला जातो, परंतु तो खरा नाही. अशा रीतीने पहिल्या पदवीचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा करावा ही सूचना शिक्षणेतर कारणांसाठी विकृत स्वरूपात अमलात आणल्यामुळे पदवी शिक्षणाचा दर्जा सुधारला तर नाहीच, उलट तो खालावला. महाराष्ट्रात फक्त मुंबई विद्यापीठानेच तो शिक्षणक्रम स्वीकारला नाही, आणि अनुभवांती मुंबई विद्यापीठाचा निर्णयच बरोबर होता हे आता बहुतेक प्राध्यापक मान्य करतात.

विदर्भात आणि मराठवाड्यात पहिली पदवी मिळविण्यापूर्वी एकूण चौदाच वर्षे अध्ययन करावे लागते. परंतु पश्चिम महाराष्ट्रात मात्र ही कालमर्यादा पंधरा वर्षांची आहे याचा उल्लेख केलाच आहे. महाराष्ट्राच्या सर्व विभागांतील शिक्षणव्यवस्थेत एकसूत्रता यावी म्हणून शालेय शिक्षणाची पुनर्रचना करण्याचे शासनाने ठरविले आहे आणि नव्या योजनेची अंमलबजावणीही सुरू झाली आहे. शालेय शिक्षणाचा जो नवा आकृतिबंध शासनाने मतासाठी प्रसिद्ध केला होता त्याप्रमाणे दहा वर्षांच्या शिक्षणानंतर एस्. एस्. सी. परीक्षा, त्यानंतर दोन वर्षांच्या शिक्षणानंतर हायर सेकंडरी स्कूल परीक्षा आणि त्यानंतर तीन वर्षांचा पदवीचा विद्यापीठीय शिक्षणक्रम अशी योजना होती.

म्हणजे पहिल्या पदवीपर्यंतच्या शिक्षणक्रमाची कालमर्यादा पंधरा वर्षेच ठेवली होती. हे शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक व योग्य होते. परंतु प्रत्यक्षात आता जो आकृतिबंध मंजूर झाला आहे, त्यात मात्र दहा वर्षांच्या शिक्षणानंतर एस्. एस्. सी., त्यानंतर एकाच वर्षाने हायर सेकंडरी, आणि त्यानंतर तीन वर्षांचा पहिल्या पदवीचा अभ्यासक्रम, असा एकूण फक्त चौदा वर्षांचाच अध्ययनकाल ठेवला आहे. ही तात्पुरती योजना असून सर्व देशात जेव्हा दहा अधिक दोन अधिक तीन असा एकूण पंधरा वर्षांचा अभ्यासक्रम सुरू होईल तेव्हा तो महाराष्ट्रातही अमलात आणला जाईल असे शासनाने जाहीर केले आहे. म्हणजे तेवीस वर्षांपूर्वी राधाकृष्णन् आयोगाने जी शिफारस केली होती, आणि पाच वर्षांपूर्वी कोठारी आयोगानेही जिचा पुरस्कार केला होता, ती अमलात आणून प्रगती तर केली नाहीच परंतु पश्चिम महाराष्ट्रापुरती पुच्छप्रगतीच झाली आहे. शैक्षणिक गुणवत्तेशी ज्यांचा काहीच संबंध नाही अशा अन्य कारणांसाठीच हे पीछेहाटीचे धोरण स्वीकारले गेले आहे.

शालेय शिक्षणाचा जो नवा आलेख महाराष्ट्र शासनाने तयार केला आहे, त्यानुसार सध्या एस्. एस्. सी. परीक्षेनंतर जे प्री-डिग्री किंवा प्री-युनिव्हर्सिटी किंवा फर्स्ट इयर या नावाने ओळखले जाणारे एक वर्षाचे शिक्षण महाविद्यालयात दिले जाते ते शाळांतूनच दिले जावे असे अभिप्रेत आहे. अर्थात ते उच्च माध्यमिक शाळांतून दिले जाईल हे उघड आहे. माध्यमिक शाळांचा दर्जा वाढवून त्यांचे उच्च माध्यमिक शाळांत रूपांतर करणे इतके खर्चाचे काम आहे की, पुढील चार पाच वर्षांत फारच थोड्या शाळांना हा दर्जा मिळू शकेल. बहुसंख्य विद्यार्थी साध्या माध्यमिक शाळांतूनच दहा वर्षे अध्ययन केल्यानंतर एस्. एस्. सी. परीक्षा उत्तीर्ण होतील आणि त्यांना प्री-डिग्रीच्या वर्गात प्रवेश द्यावा लागेल. आणि म्हणून विद्यापीठांना स्वतःची पूर्वीच्या मॅट्रिक परीक्षेसारखी परीक्षा सुरू करावी की कसे या प्रश्नाचा विचार करावा लागेल. विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची पात्रता ज्यानुसार ठरविली जाते असे "स्टॅट्यूट्स्" प्रत्येक विद्यापीठाने केले आहेत. त्यात महाविद्यालयात प्री-डिग्रीच्या वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी कोणते विषय घेऊन एस्. एस्. सी. परीक्षा उत्तीर्ण झाली पाहिजे ते नमूद केले आहे. हे सर्व "स्टॅट्यूट्स्" जून १९७४ पर्यंत बदलून जून १९७५ मध्ये कोणाला महाविद्यालयांच्या प्री-डिग्रीच्या वर्गात प्रवेश मिळेल ते स्पष्ट करणे अवश्य आहे. विद्यापीठांच्या निरनिराळ्या अधिकार-मंडळांपुढे हा प्रश्न ठेवून "स्टॅट्यूट्स्"मध्ये जरूर तो फेरफार करणे, विद्यापीठ जर स्वतःची प्रवेश-परीक्षा सुरू करणार असेल तर तिचा अभ्यासक्रम ठरविणे आणि परीक्षा घेण्यासाठी जरूर ती यंत्रणा उभी करणे, या सर्व कामासाठी अडीच-तीन वर्षांचा अवधी सहज लागेल. म्हणून या प्रश्नाकडे महाराष्ट्रातल्या सर्व विद्यापीठांनी तातडीने लक्ष पुरविणे जरूर आहे.

या संदर्भात आणखी एक प्रश्न उत्पन्न होणार आहे. तो तातडीचा नसला तरी त्याचाही विचार करण्यास आतापासून सुरुवात करणे इष्ट होईल. महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेल्या धोरणानुसार सध्या महाविद्यालयात दिले जाणारे प्री-डिग्री किंवा तत्सम दर्जाचे शिक्षण माध्यमिक शाळांकडे सुपूर्त करण्यात येणार आहे. बहुसंख्य माध्यमिक शाळांचे रूपांतर उच्च माध्यमिक शाळांत जून १९८० पर्यंत होईल असे जर गृहीत धरले, तर आणखी दहा वर्षांच्या काळात महाविद्यालयातले प्री-डिग्रीचे किंवा तत्सम वर्ग बंद करावे लागतील हे उघड आहे. महाविद्यालयातले बहुसंख्य विद्यार्थी प्री-डिग्रीच्या वर्गातले असतात आणि त्यांच्याकडून मिळणारे शिक्षण-शुल्क (फी) हे महाविद्यालयाच्या एकूण उत्पन्नाचा मोठा भाग असते. हे उत्पन्न बंद झाले की, महाविद्यालयापुढे मोठी आर्थिक समस्या उभी राहणार आहे. सध्या शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात मोठी वाढ केल्याशिवाय तिची समाधानकारक सोडवणूक होणार नाही. म्हणून याही प्रश्नाची आताच दखल घेणे युक्त होईल.

विद्यापीठांनी शिक्षणाची जबाबदारी स्वतः घ्यावी असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा साधारणतः पदव्युत्तर शिक्षण अभिप्रेत असते, पहिल्या पदवीपर्यंतचे शिक्षण नव्हे. ज्या विद्यापीठांची घटना यूनिटरी स्वरूपाची असते, ती विद्यापीठे अर्थात सर्वच शिक्षणाची जबाबदारी स्वतःकडे घेतात. अशा विद्यापीठांत संलग्न महाविद्यालये असतच नाहीत. परंतु जी विद्यापीठे संलग्नीकरण करणारी आणि शिक्षण देणारीही असतात त्यात सामान्यतः पहिल्या पदवीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी संलग्न महाविद्यालयांकडे सोपविण्यात येते, आणि पदव्युत्तर शिक्षणाची जबाबदारीच फक्त काही कमीअधिक प्रमाणात विद्यापीठाकडे येते. उच्च शिक्षणाचा कस वाढवावयाचा असेल तर केवळ पदव्युत्तर शिक्षणावरच लक्ष केंद्रित करून चालणार नाही. पहिल्या पदवीपर्यंतच्या शिक्षणाचीही गुणवत्ता वाढविण्यासाठी विद्यापीठाने खास प्रयत्न केले पाहिजेत. त्या दृष्टीने १९४९ साली स्थापन झालेल्या पुणे विद्यापीठाच्या कायद्यात पदव्युत्तर शिक्षणाबरोबर पुणे शहरांतल्या पहिल्या पदवीसाठी दिल्या जाणाऱ्या शेवटच्या दोन वर्षांच्या शिक्षणाची, म्हणजे "पोस्ट इंटरमीजिएट" शिक्षणाची जबाबदारी विद्यापीठावर सोपविण्यात आली आहे. याबाबत पुणे विद्यापीठाने काय कृती केली, आणि विद्यापीठाचा प्रयोग कसा आणि का फसला ते आता थोडक्यात पाहावयाचे आहे.

पुणे विद्यापीठ जेव्हा स्थापन झाले, त्या वेळची पुणे शहरातील प्रमुख महाविद्यालये म्हणजे फर्ग्युसन, सर परशुरामभाऊ आणि नवरोसजी वाडिया. ही सर्वच महाविद्यालये पुणे विद्यापीठाच्या स्थापनेआधी कित्येक वर्षे अस्तित्वात होती आणि मुंबई विद्यापीठाशी संलग्न असताना बी. ए. आणि बी. एस्सी. चे सर्वच शिक्षण, आणि काही प्रमाणात पदव्युत्तर शिक्षणही, आपापल्या जबाबदारीवर करीत होती. पुणे

विद्यापीठाच्या स्थापनेनंतर ती घटक महाविद्यालये झाली, म्हणजे त्यांचा दर्जा वाढला, परंतु बी. ए. आणि बी. एस्सी. च्या शिक्षणाची जबाबदारी मात्र त्यांच्याकडे स्वतंत्रपणे न राहता ती विद्यापीठाकडे गेली. आरंभी विद्यापीठाच्या संबंधित अधिकारमंडळांनी असे ठरविले की, बी. ए. चे बहुतेक विषय सर परशुरामभाऊ महाविद्यालयात शिकवावे, परंतु काही विषयांच्या शिक्षणाची सोय वाडिया महाविद्यालयातही करावी. बी. एस्सी. चे विषय मात्र फर्ग्युसन, सर परशुरामभाऊ व वाडिया या तीनही महाविद्यालयांत शिकवावे. यानंतर मात्र लवकरच बी. ए. च्या शिक्षणाचे एकच केंद्र असावे की कसे याबद्दल वाद सुरू होऊन तो चिघळत गेला. त्यावेळचे कुलगुरू डॉ. जयकर यांनी या संदर्भात जे निर्णय वेळोवेळी दिले ते पुढीलप्रमाणे आहेतः-

(१) पुणे विद्यापीठाच्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे विद्यापीठाचे अंतिम उद्दिष्ट विद्यापीठाने द्यावयाच्या शिक्षणासाठी (म्हणजे केवळ पदव्युत्तर नव्हे तर पुणे शहरात बी. ए. आणि बी. एस्सी. सुद्धा) यूनिटरी स्वरूपाचे एकच केंद्र स्थापणे हे आहे.

(२) हे तत्त्व विद्यापीठाच्या सर्व संबंधित अधिकार मंडळांनी मान्य केलेले आहे.

(३) कायद्याच्या दृष्टीने या तत्वाची अंमलबजावणी तावडतोब झालीच पाहिजे असे नव्हे. विद्यापीठाने हे उद्दिष्ट क्रमाक्रमाने साध्य करावयाचे आहे.

(४) या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी जी कृती विद्यापीठ करील तिला कुलगुरू मान्यता देतील. परंतु ज्या कृतीमुळे या उद्दिष्टापासून विद्यापीठ दूर जाते आहे, किंवा ज्या कृतीमुळे आतापर्यंत केलेल्या प्रगतीत विक्षेप येतो आहे असे कुलगुरूंना वाटेल, ती कृती खपवून घेण्यात येणार नाही.

या संदर्भात कुलपतींच्याकडेही प्राचार्य डॉ. कर्वे व प्राचार्य जोग यांनी निवेदने सादर केली होती आणि कुलपतींनीही डॉ. जयकर यांनी कायद्याचा केलेला अर्थ बरोबर आहे असा निर्णय दिला होता. वादाचा मुद्दा विद्यापीठाने केंद्रीकरण करावे की सुसूत्रीकरण करावे हा होता. कुलपतींच्या निर्णयाचा सारांश केंद्रीकरण हे अंतिम उद्दिष्ट असून ते सुसूत्रीकरणाने क्रमाक्रमाने साध्य करावयाचे आहे असा आहे.

बी. ए. आणि बी. एस्सी. च्या शिक्षणाची कायद्याने दिलेली जबाबदारी पार पाडण्याकरता पुणे विद्यापीठाने जी शासकीय व्यवस्था केली ती मात्र दोषपूर्ण होती आणि पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या तीव्र असंतोषास ती कारणीभूत ठरली. तीमुळे विद्यार्थ्यांना या महाविद्यालयातून त्या महाविद्यालयात अशी धावपळ करावी लागे, पुरेशा ग्रंथालयीन सवलती मिळेनात आणि शिस्तीतही बिघाड झाला. पहिल्या पदवीच्या शिक्षणाचा दर्जा वाढविणे हे जे मूळ उद्दिष्ट होते, ते चुकीची शासनव्यवस्था केल्यामुळे पूर्ण होऊ शकले नाही. या सर्वच प्रश्नांचा फेरविचार करण्यासाठी १९५६ साली, म्हणजे

रँग्लर परांजपे कुलगुरू झाल्यानंतर, विद्यापीठाने न्यायमूर्ती गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने आपला अहवाल १९५७ च्या जानेवारीत सादर केला. अहवालाची तपशीलवार चर्चा करण्याची आवश्यकता नाही. परंतु पहिल्या पदवीच्या शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याच्या संदर्भात एका महत्त्वाच्या मुद्याचा विचार करावयाचा आहे.

डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सुसूत्रीकरणाची किंवा केंद्रीकरणाची तरफदारी करणारे जे निवेदन सादर केले, त्यात असे आग्रहाने प्रतिपादिले आहे की, सुसूत्रीकरणाच्या योजनेमुळे प्राध्यापकांना आपल्या विषयाच्या एका भागावर विस्तृत वाचन करून विशेष प्रावीण्य (स्पेशलायझेशन) मिळविणे शक्य झाले आहे. प्राध्यापकाला आपल्या विषयाचा एकच भाग (पेपर) काही वर्षे सतत शिकविण्याची संधी मिळाली तर त्या भागात तो विशेष प्रावीण्य संपादू शकेल आणि अर्थात त्याच्या अध्यापनाचा कस वाढेल. गजेंद्रगडकर समितीने हा शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचा मुद्दा खोडून काढताना असा युक्तिवाद केला आहे की, बी. ए. च्या पातळीवर विशेष प्रावीण्य संपादण्यासाठी फारसा वावच नाही, कारण ते पदव्युत्तर पातळीवर, म्हणजे एम्. ए. च्या पातळीवर संपादावयाचे असते. बी. ए. च्या पातळीवर विद्यार्थ्याने विशेष प्रावीण्य संपादावयाचे नसते हे उघडच आहे. परंतु बी. ए. च्या पातळीवर अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकाने ते संपादन करण्याची जरुरी नाही हा युक्तिवाद मुळीच टिकण्यासारखा नाही. उदाहरणार्थ, बी. ए. (ऑनर्स) किंवा बी. ए. (स्पेशल)साठी इंग्रजी मुख्य विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी वाङ्मयाचा इतिहास, वाङ्मयीन टीकेची मूलतत्त्वे, कादंबरी, नाटक, " लिरिक " यासारखे वाङ्मय प्रकार किंवा " फॉर्म्स " हे विषय किंवा 'पेपर' शिकावे लागतात. एकाच शहरातल्या तीन महाविद्यालयांतल्या निरनिराळ्या प्राध्यापकांनी हे सर्व विषय स्वतंत्रपणे शिकविण्याऐवजी सुसूत्रीकरण करून एकाच प्राध्यापकाकडे इंग्रजी वाङ्मयाचा इतिहास हा पेपर काही वर्षे सोपविला तर त्याला विस्तृत वाचन करण्यास जास्त वेळ मिळेल आणि त्याच्या अध्यापनाचा कस वाढेल हे उघड आहे. वाचण्यासारखे वाङ्मय पुष्कळच आहे आणि त्यात प्रत्यही भर पडत आहे. बी. ए. ला शिकविल्या जाणाऱ्या तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, इतिहास इत्यादी विषयांचे तसेच आहे. गजेंद्रगडकर समितीने इकडे दुर्लक्ष करून, सुसूत्रीकरण करण्यासाठी पुणे विद्यापीठाने अवलंबिलेल्या शासनव्यवस्थेतील दोष काढून टाकण्यासाठी एका महत्त्वाच्या शैक्षणिक मूल्यालाच तिलांजली दिली. म्हणजे इंग्रजीत ज्याला " Throwing out the baby with the bath-water " असे म्हणतात तसा प्रकार झाला! चुकीच्या शासकीय व्यवस्थेमुळे शैक्षणिक मूल्यांची कशी हेळसांड होते आणि शासनातील दोष दूर करताना शैक्षणिक तत्त्वांचाच कसा विसर पडतो, त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. पहिल्या पदवीच्या

शिक्षणाची गुणवत्ता जर वाढवावयाची असेल तर केवळ पुणे विद्यापीठानेच नव्हे, तर महाराष्ट्रातल्या सर्वच विद्यापीठांनी सुसूत्रीकरणाचे तत्त्व मान्य करून या प्रश्नाचा फेरविचार करण्याची जरूरी आहे. मुंबईसारख्या ठिकाणी तर ती विशेषत्वाने आहे. मुंबई विद्यापीठ हे फेडरल स्वरूपाचे विद्यापीठ असल्यामुळे त्याला या संदर्भात काही परिणामकारक कृती करणे फार कठीण नाही. मी तर असे म्हणेन की, विद्यापीठाने काही कृती करण्याची वाट न पहता मुंबईच्या निरनिराळ्या भागात जवळजवळ असणाऱ्या तीन-तीन चार-चार महाविद्यालयांनी एकत्र येऊन सोयीस्कर गट करावेत आणि निदान काही विषयांत तरी परस्पर सहकार्याने सुसूत्रीकरणाचा प्रयोग करून पाहावा. यासाठी विद्यापीठाच्या कोणत्याही नियमांची आडकाठी येण्याचे कारण नाही.

आता पदव्युत्तर शिक्षणाच्या आणि संशोधनाच्या गुणवत्तेबद्दल थोडा विचार करावयाचा आहे. विद्यापीठांचे काम फक्त महाविद्यालये संलग्न करण्यापुरतेच मर्यादित असू नये. विद्यापीठांनी शिक्षणाची जबाबदारी स्वतःकडे घेतली पाहिजे हा विचार फार जुना आहे. ही जबाबदारी म्हणजे पदव्युत्तर शिक्षणाची आणि संशोधनाची जबाबदारी असे सामान्यतः मानण्यात येते. आताच उल्लेख केलेल्या गजेंद्र गडकर समितीने " पोस्ट-इंटरमीजिएट " शिक्षणाबाबत सुसूत्रीकरणाचा जो प्रयोग पुणे विद्यापीठाने केला, तो त्याज्य ठरविला असला, तरी सुसूत्रीकरणाचे तत्त्व मात्र टाकून देऊ नये असे म्हटले आहे. समितीने पदव्युत्तर शिक्षणाबाबत मात्र त्यावेळी दिली विद्यापीठाचे कुलगुरू असलेले डॉ. ग. स. महाजनी यांचे मत उद्धृत केले आहे आणि ते आपल्याला मान्य असल्याचे स्पष्टपणे सूचित केले आहे. डॉ. महाजनी यांनी असे म्हटले आहे की, पुणे शहरात पदव्युत्तर शिक्षणाची आणि संशोधनाची जबाबदारी विद्यापीठाने स्वतःकडेच घ्यावी. अर्थात पुणे विद्यापीठाच्या कायद्यातच अशी तरतूद आहे की, पदव्युत्तर शिक्षणाची जबाबदारी केवळ पुणे शहरातच नव्हे तर विद्यापीठाच्या सर्वच अधिकारक्षेत्रात विद्यापीठाची आहे. पुण्याबाहेरच्या एखाद्या महाविद्यालयास जेव्हा पदव्युत्तर शिक्षण देण्याची परवानगी दिली जाते तेव्हा त्या महाविद्यालयाला एम्. ए. चा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी संलग्नीकरण दिले जात नाही. तर संबंधित महाविद्यालय विद्यापीठाच्या वतीने पदव्युत्तर शिक्षण देते. तेव्हा डॉ. महाजनी यांच्या म्हणण्याचा अर्थच असा की, पुण्यापुरते पदव्युत्तर शिक्षण विद्यापीठाच्या स्वतःच्या आवारात केंद्रित करावे. पुणे विद्यापीठाने हेच धोरण प्रथमपासून स्वीकारले आणि ते अत्यंत योग्य असल्याचा बिनतोड पुरावा म्हणजे गेल्या सुमारे वीस वर्षांत विद्यापीठाने सुरू केलेल्या निरनिराळ्या पदव्युत्तर शिक्षण-विभागांची उत्तम वाढ झाली आणि त्यांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. पश्चिम महाराष्ट्रात पदव्युत्तर शिक्षणाची आणि संशोधनाची सर्वोत्तम सोय पुणे विद्यापीठातच आहे असे विद्यापीठ अनुदान मंडळाचे अधिकारीही मानतात.

परंतु पुणे विद्यापीठातच नव्हे तर महाराष्ट्रात इतरत्रही पदव्युत्तर शिक्षणाचा दर्जा गेल्या काही वर्षांत घसरत चालला आहे आणि त्याचे निदान तात्कालिक कारण तरी महाविद्यालयीन प्राध्यापकांची सुधारित वेतनश्रेणी हे आहे! कसे ते थोडक्यात पाहू.

चौथ्या पंचवार्षिक योजनेत विद्यापीठातील आणि महाविद्यालयांतील प्राध्यापकांची वेतनश्रेणी सुधारण्याची घोषणा केंद्र सरकारने केली. ज्या राज्य सरकारांना ही वेतनश्रेणी अमलात आणावयाची असेल त्यांना वाढीव खर्चाच्या ऐंशी टक्के अनुदान चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात मिळेल आणि त्यानंतर मात्र शंभर टक्के जबाबदारी राज्य सरकारने स्वीकारली पाहिजे असेही केंद्र सरकारने सांगितले. ही योजना महाराष्ट्र राज्य सरकारला तत्त्वतः मान्य असल्याची घोषणा शिक्षणमंत्र्यांनी विधिसभेच्या नागपूर अधिवेशनाच्या वेळी केली आणि नंतर सुमारे एक वर्षाने नोव्हेंबर १९६७ च्या सुरवातीस संबंधित जी. आर. निघून तो महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांकडे अंमलबजावणीसाठी पाठविण्यात आला. महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी रु. ३०० ते रु. ६००, रु. ४०० ते रु. ८०० आणि रु. ७०० ते रु. ११०० या तीन सुधारित वेतनश्रेणी आहेत. मात्र सर्वोच्च म्हणजे रु. ७०० ते रु. ११०० ही वेतनश्रेणी फक्त ज्या प्राध्यापकांना किमान एक वर्षाचा पदव्युत्तर शिक्षणाचा अनुभव आहे त्यांनाच द्यावी अशी अट घालण्यात आली. केंद्र सरकारच्या योजनेनुसार ही वेतनश्रेणी पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांसाठीच होती. भारताच्या उत्तरेकडील भागात अशी महाविद्यालये आहेत, परंतु महाराष्ट्रात, आणि दक्षिणेकडच्या इतर प्रांतांतही, अशी महाविद्यालये नाहीत. महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या कायद्याप्रमाणे पदव्युत्तर शिक्षण ही सर्वस्वी विद्यापीठाची जबाबदारी आहे. ज्या काही महाविद्यालयांत पदव्युत्तर शिक्षण दिले जाते ते विद्यापीठाच्या वतीने दिले जाते. म्हणून सुरुवातीला केंद्र सरकारने महाराष्ट्रातील महाविद्यालयांसाठी रु. ३०० ते ६०० आणि रु. ४०० ते रु. ८०० या दोन वेतनश्रेणीच मंजूर केल्या.

नंतर महाराष्ट्रासाठी "खास सवलत" म्हणून रु. ७०० ते रु. ११०० ही वेतनश्रेणीही मंजूर करण्यात आली. परंतु आताच सांगितल्याप्रमाणे ज्या महाविद्यालयीन प्राध्यापकांना किमान एक वर्षाचा पदव्युत्तर शिक्षणाचा अनुभव होता, तेच या वेतनश्रेणीसाठी पात्र ठरले. याचे अनेक विपरीत परिणाम झाले. पुणे विद्यापीठाने रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र यांसारख्या विज्ञानाच्या विषयांचे पदव्युत्तर शिक्षण विद्यापीठातच केंद्रित केले होते. म्हणून पुण्याबाहेरच्या संलग्न महाविद्यालयांतील काही विज्ञान विषयाच्या प्राध्यापकांना सेवेतील ज्येष्ठता आणि शैक्षणिक पात्रता असूनही केवळ पदव्युत्तर शिक्षणाचा अनुभव नाही म्हणून सर्वोच्च वेतनश्रेणी मिळाली नाही; परंतु ती हिंदी आणि मराठी यासारख्या विषयांच्या प्राध्यापकांना, ते सेवेत कनिष्ठ असूनही मिळू शकली. ही परिस्थिती महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांत

होती. साहजिकच प्राध्यापकांत तीव्र असंतोष माजला. परंतु त्याहीपेक्षा गंभीर परिणाम म्हणजे पदव्युत्तर शिक्षणाच्या गुणवत्तेची पातळी खाली आणण्याची प्रक्रिया सुरू झाली. महाविद्यालयीन प्राध्यापकांची पदव्युत्तर शिक्षणासाठी पात्रता ठरविताना ज्या कसोट्या लावल्या जातात त्यात पहिल्या पदवीच्या पातळीवर प्रत्यक्ष शिकविण्याचा अनुभव ही एक महत्त्वाची आहे. पहिल्या पदवीची पातळी म्हणजे मुंबईत इंटरनंतरची पातळी आणि जेथे तीन वर्षांचा पहिल्या पदवीचा अभ्यासक्रम चालू आहे तेथे त्या अभ्यासक्रमाचे दुसरे आणि तिसरे वर्ष. पहिल्या पदवीच्या अभ्यासक्रमात ऑनर्स किंवा स्पेशलचे पेपर आणि पास किंवा जनरल आणि सबसिडियरीच्या पातळीचे पेपर असतात. पदव्युत्तर शिक्षणाचा दर्जा वर वाढवावयाचा असेल तर ज्या प्राध्यापकांना फक्त जनरल किंवा सबसिडियरीच्या पातळीवरचे अभ्यासक्रम शिकविण्याचाच अनुभव असेल त्यांना पदव्युत्तर शिक्षक म्हणून मान्यता देणे शैक्षणिक दृष्ट्या योग्य नव्हे. परंतु महाराष्ट्रातील बहुतेक विद्यापीठांत अशी मान्यता आज दिली जाते. त्याचबरोबर अशा अपरिपक्व प्राध्यापकांना पदव्युत्तर शिक्षणाचा अनुभव मिळावा म्हणून पदव्युत्तर शिक्षण देण्याची जास्त जास्त महाविद्यालयांना परवानगी दिली जाते. अशा परवानगीसाठी महाविद्यालयांना पुरेशी शैक्षणिक पात्रता असलेले प्राध्यापक नेमणे, ग्रंथालये आणि प्रयोगशाळा यांत सुधारणा करणे अशासारख्या अटी पुऱ्या कराव्या लागतात. परंतु अशा अटी सैल करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. पदव्युत्तर शिक्षणाच्या गुणवत्तेकडे जे विशेष लक्ष द्यावयास पाहिजे ते दिले जात नाही याचे प्रमुख कारण म्हणजे रु. ७०० ते रु. ११०० या वरच्या वेतनश्रेणीची पदव्युत्तर शिक्षणाशी घातली गेलेली अयोग्य सांगड. चुकीची शासकीय निर्णयाने उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेवर कसे गंभीर परिणाम होतात त्याचे हे आणखी एक उदाहरण. या चुकीच्या निर्णयास केंद्र सरकार व राज्य सरकार हे दोघेही जबाबदार आहेत. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात, म्हणजे १ एप्रिल, १९६६ पासून ३१ मार्च १९७१ पर्यंत, महाविद्यालयीन प्राध्यापकांची वेतनश्रेणी सुधारण्यासाठी जो वाढीव खर्च आला त्याच्या ऐंशी टक्के अनुदान केंद्राने दिले. अर्थात केंद्र सरकारची अट पाळण्यावाचून महाराष्ट्र राज्य सरकारला गत्यंतर नव्हते. परंतु १ एप्रिल, १९७१ नंतर मात्र याबाबतची शंभर टक्के जबाबदारी राज्य सरकारने घेतली आहे. शिक्षणाच्या समान संधीचे तत्त्व जरी मान्य केले, तरी पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधन हा काही कुणाचा मूलभूत हक्क होऊ शकत नाही. या मर्यादित क्षेत्रात तरी गुणवत्ता हा एकमेव निकष असला पाहिजे. महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री गुणवत्तेचे चाहते आहेत. त्यांनी आता पदव्युत्तर शिक्षण आणि सर्वोच्च वेतनश्रेणी यांची सांगड तोडून टाकण्याचे श्रेय घ्यावे आणि पदव्युत्तर शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी मदत करावी.

पहिल्या पदवीपर्यंतच्या आणि पदव्युत्तर शिक्षणाची गुणवत्ता कशी घसरत आहे हे आतापर्यंत पाहिले. उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी "मेजर युनिव्ह-र्सिटीज्"च्या स्थापनेबाबत कोठारी आयोगाने जी प्रतिगामी आणि अव्यवहार्य सूचना केली आहे तिची आता थोडी तपशीलवार चर्चा करावयाची आहे. त्यापूर्वी विद्या-पीठांतल्या चिंतनीय सद्यःस्थितीचे जे वर्णन कोठारी आयोगाने केले आहे ते उद्धृत करणे योग्य होईल. आयोगाच्या अहवालातले काही उतारे आता देतो—

"शैक्षणिक वर्गातली उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांतली परिस्थिती पाहिली तर स्थूलमानाने शैथिल्य आणि अवास्तव ताण या दोन टोकांत आंदोलने होत आहेत असे दिसते: शिक्षण देण्याच्या वेळी शैथिल्य आणि परीक्षेच्या वेळी ताण. बऱ्याचशा दुर्बल महाविद्यालयांत आणि विद्यापीठांत शिक्षक यांत्रिक पद्धतीने आणि स्वतःचे मन न लावता शिकवतात. ते जे विषय शिकवितात त्याबाबत त्यांना आस्था किंवा निष्ठा असतच नाही."

"बहुसंख्य प्राध्यापक आर्थिक विवंचनेने पीडित असतात. अपुरी वेतनश्रेणी देणाऱ्या महाविद्यालयातील शिक्षकांबाबत हे विशेषत्वाने खरे आहे. मन लावून अभ्यास करण्यासाठी आणि सहकाऱ्यांशी बौद्धिक चर्चा करण्यासाठी किमान सोयीही उपलब्ध असत नाहीत. सर्व प्राध्यापकांसाठी एकच खोली असते आणि सर्व प्राध्यापक एकाच वेळी बसू शकतील इतकी ती मोठीही नसते. काही संस्थांत बौद्धिक वातावरणाच्या निर्मितीला आणि पोषणाला बाधक अशा इतरही अनेक गोष्टी असतात. महाविद्यालयात आणि विद्यापीठाच्या निरनिराळ्या शैक्षणिक विभागांत सत्तेचे केंद्रीकरण, ज्येष्ठ आणि कनिष्ठ प्राध्यापकांत एकमेकांविषयी असलेला अविश्वास, शासकीय अधिकाऱ्यांबद्दल तुच्छतेची भावना, निरनिराळ्या अधिकारपदांबाबत परस्परांमध्ये संघर्ष, आणि उच्च दर्जाची शैक्षणिक पात्रता मिळविलेल्यांच्याबद्दल असूया—या सर्व गोष्टी आपापल्या परीने बौद्धिक जिज्ञासेला मारक ठरल्या आहेत. काही प्राध्यापक आपल्या विषयाच्या सखोल अध्ययनाकडे दुर्लक्ष करून तुलनेने क्षुद्र अशा आर्थिक लाभासाठी किंवा अधिकार-पदासाठी कट आणि संघर्ष करण्यास उद्युक्त होतात."

"विद्यार्थ्यांच्या परिस्थितीकडे पाहिले तर तीही जास्त चांगली नाही. बरेच विद्यार्थी तौलनिक दृष्ट्या किंवा संपूर्णपणे अशिक्षित कुटुंबातून आलेले असतात. उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांची शालेय जीवनात पुरेशी तयारी करून घेतलेली नसते. स्वतंत्रपणे अभ्यास करण्याचा त्यांना फारच थोडा अनुभव असतो. त्यांची जिज्ञासा जागृत झालेली नसते. आणि त्यांच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे यांत्रिक पाठांतर. असे विद्यार्थी आपल्या प्राध्यापकांशी किंवा इतर विद्यार्थ्यांशी बौद्धिक चर्चा करीत नाहीत. त्यांचे मुख्य कर्तव्य म्हणजे जी भाषा त्यांना नीटशी कळत नाही, त्या भाषेत दिलेली

शुल्क व्याख्याने ऐकणे. जर शिक्षणाचे माध्यम एखादी भारतीय भाषा असेल, तर त्या भाषेत योग्य दर्जाची पाठ्यपुस्तके आणि इतर पूरक वाङ्मय उपलब्ध असत नाही. या विद्यार्थ्यांनी इंग्रजी पाठ्यपुस्तके वाचावी अशी अपेक्षा करणे वाजवी नाही, कारण ग्रंथालयाची भाषा म्हणूनही त्यांना इंग्रजीचे ज्ञान झालेले नसते. जे थोडे वरच्या दर्जाचे विद्यार्थी असतात त्यांच्याही बौद्धिक सामर्थ्याचा पुरेपूर विकास होत नाही, कारण शिक्षणक्रमात तशी तरतूद नसते आणि स्फूर्तिदायक शिक्षकांचा अभाव असतो. यात भर म्हणजे पुष्कळ विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असते आणि म्हणून त्यांना अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे शक्य होत नाही."

उच्च शिक्षणातील सद्यःपरिस्थितीचे इतके विदारक वर्णन केल्यानंतर कोठारी आयोगाने म्हटले आहे की, यात किंचितही अतिशयोक्ती नाही. अशी परिस्थिती पूर्वी अनेक वर्षे होती. परंतु ती आता विशेष गंभीर झाली आहे. कारण स्वातंत्र्यानंतर उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात झपाट्याने वाढ झाली आहे आणि लोकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात उच्च अधिकारपदे परकयांच्या हातात होती आणि म्हणून बुद्धिजीवी वर्गाच्या कार्यक्षमतेला गौण स्थान होते. आता मात्र देशाच्या प्रगतीची सर्व जबाबदारी आपल्यावरच आहे आणि उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेला निर्णायक महत्त्व आले आहे. या गुणवत्तेत जर तातडतोब वाढ झाली नाही तर आपली शासकीय कार्यक्षमता आणि तांत्रिक विकास, बौद्धिक दर्जा आणि सामाजिक प्रगती, यांवर विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेत तौलनिक दृष्ट्या कमी वेळात वाढ करण्यासाठी "मेजर युनिव्हर्सिटीज"ची स्थापना करावी असे कोठारी आयोगाने सुचविले आहे. या सूचनेचे समर्थन करताना असे म्हटले आहे की, सध्या उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अल्प प्रमाणात उपलब्ध असलेले उत्कृष्ट दर्जाचे शिक्षक आणि संशोधक सर्वत्र विखुरलेले आहेत. सध्या सुद्धा आपल्या विद्यापीठातून आणि महाविद्यालयातून उत्तम दर्जाचे शास्त्रज्ञ आणि विद्वान थोड्या संख्येने निर्माण होतात. ते जर अनुकूल अशा वातावरणात उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आले, तर उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी मोठा हातभार लावू शकतील. परंतु आपल्या देशाच्या एकूण गरजेच्या मानाने अशांची संख्या फार अल्प आहे. म्हणून ते विखुरले जातात आणि त्यांना एकटेपणाने प्रतिकूल वातावरणात काम करावे लागते. त्यामुळे उच्च शिक्षणाची सर्वसाधारण पातळी उंचावण्यासाठी त्यांचा फारसा उपयोग होऊ शकत नाही. एवढेच नव्हे तर त्यांचे स्वतःचे कर्तृत्वही गंजून जाते आणि सर्जनशीलता नष्ट होते. असे लोक जर एकत्र येऊ शकले तर उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी उत्कृष्ट कार्य करू शकतील. भारतातील उच्च शिक्षणाची पातळी आणि पाश्चात्य देशांतील विद्यापीठीय शिक्षणाची

पातळी यत वरीच तफावत आहे आणि ती दिवसेंदिवस वाढत जात आहे. म्हणून आपल्या देशातील तुटपुंजी साधनसामग्री ज्यांना "मेजर युनिव्हर्सिटीस" म्हणता येईल अशा सहा विद्यापीठांत केंद्रित करावी म्हणजे त्यांचा दर्जा सुमारे दहा वर्षांत पाश्चात्त्य विद्यापीठांइतका होईल आणि नंतर या अत्युच्च विद्यापीठांत शिकून तयार झालेले विद्यार्थी हळूहळू इतर कनिष्ठ दर्जाच्या विद्यापीठांत जातील आणि कालांतराने त्यांचाही दर्जा वाढवतील असे एकंदर कोठारी आयोगाचे प्रतिपादन आहे.

कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सप्टेंबर १९६६ मध्ये पुणे विद्यापीठाच्या पदवीदान समारंभामध्ये जे दीक्षान्त भाषण केले त्यात या सूचनेचे वैयर्थ्य थोडक्यात पण निर्णायकपणे दाखवून दिलेले आहे. डॉ. गाडगिळांच्या टीकेचा सारांश पुढीलप्रमाणे आहे :—

"पाश्चात्त्य प्रगत देशातील विद्यापीठांच्या तुलनेने आपल्या विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा निकृष्ट आहे आणि दोघांच्या पातळीतील फरक दिवसेंदिवस वाढतो आहे, यावर कोठारी आयोगाने भर दिलेला आहे. परंतु हे उच्च शिक्षणाबाबतच नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक जीवनाच्या अनेक अंगांबाबत खरे आहे. ही समस्या फक्त उच्च शिक्षणाबाबतच सोडविता येणार नाही. आपल्या देशाच्या एकूण आर्थिक परिस्थितीत जेव्हा सुधारणा होईल आणि उपलब्ध साधनसामग्रीत वाढ होईल, तेव्हाच आपले एकंदर जीवनमान आणि शिक्षणाची पातळीही वाढेल. तोपर्यंत केवळ एकाच क्षेत्रात साधनसामग्रीचे केंद्रीकरण केल्याने एकूण परिस्थितीत सुधारणा होणार नाही. शिवाय अल्प साधनसामग्रीनिशीही गेल्या वीस वर्षांत काही भारतीय विद्यापीठांनी जी उल्लेखनीय प्रगती केली आहे, तिची पुरेशी दखल कोठारी आयोगाने घेतलेली नाही. आयोगाचे मत असे दिसते की, विद्येच्या क्षेत्रात साधनसामग्रीचे केंद्रीकरण केल्यानेच उच्चतम पातळी गाठता येते. नव्याने निर्माण होणाऱ्या "मेजर" विद्यापीठांना काही शासकीय समस्यांना तोंड द्यावे लागेल असेही आयोगाला वाटत नसावे. उत्कृष्ट शिक्षकाचा फार वेळ दैनंदिन कामातच खर्ची पडला तर त्याचा बौद्धिक विकास पूर्णपणे होणार नाही हे खरे. परंतु अशा विकासाला त्याच्या भोवती अनेक उत्कृष्ट शिक्षक आणि विद्वान असले पाहिजेत असे म्हणण्याला प्रत्यक्ष अनुभवाचा आधार नाही. भारतातल्या परिस्थितीत तरी एकाच विद्यापीठात अनेक उच्च श्रेणीचे विद्वान केंद्रित करणे म्हणजे अनेक विद्यापीठांना त्यांच्या ज्ञानापासून वंचित करणे असाच आहे. शिक्षणाची एकूण पातळी उंचावण्यासाठी मानवी साधनसामग्रीसहित सर्व साधनांचे केंद्रीकरण करावे की, त्यांचे सम प्रमाणात विभाजन करावे हा मतभेदाचा प्रश्न होऊ शकेल. परंतु त्याचा निर्णय केवळ वैयक्तिक आवडीनिवडीवरून करण्याचे कारण नाही. ज्यात साधनसामग्रीचे केंद्रीकरण झालेले आहे अशा अनेक राष्ट्रीय प्रयोगशाळा भारतात

आहेत. खुद्द दिल्लीत केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली अशा संशोधन संस्था आहेत. यात ज्या दर्जाचे काम होत आहे त्यावरून साधनसामग्रीचे केंद्रीकरण करून संशोधनाचा दर्जा सुधारतो असे मानण्याला जागा नाही. शिवाय उच्च शिक्षणातील ज्या विदारक परिस्थितीचे कोठारी आयोगानेच वर्णन केले आहे, ती "मेजर" विद्यापीठांची स्थापना करून कशी सुधारणार? उलट ती परिस्थिती जास्तच बिघडण्याचा दाट संभव आहे."

डॉ. धनंजयराव गाडगीळांनी "मेजर" विद्यापीठांच्या स्थापनेची सूचना तत्त्वतः असमर्थनीय असल्याचे दाखवून दिलेच आहे. ती सर्वस्वी अव्यवहार्यही कशी आहे ते आता पाहू. एकूण सहा "मेजर" विद्यापीठांची स्थापना करावी असे कोठारी आयोगाने सुचविले आहे, आणि त्यापैकी एक कृषि-विद्यापीठ आणि एक अभियांत्रिकी विद्यापीठ म्हणजे आय्. आय्. टी. असावे असे म्हटले आहे. म्हणजे सबंध भारतातून फक्त चार विद्यापीठे निवडावयाची. ही निवड विद्यापीठ अनुदान आयोगाने करावयाची आहे. परंतु त्यासाठी कोणते निकष लावावे याबाबत आयोगाने काहीच मार्गदर्शन केले नाही. सध्याच्या परिस्थितीत ही निवड केवळ शैक्षणिक गुणवत्तेच्या निकषावर होईल असे मानणे फारच भाबडेपणाचे होईल. दिल्ली विद्यापीठ हे केंद्रिय विद्यापीठ आहे, ते राजधानीत आहे आणि त्याचा विद्यपीठ अनुदान आयोगाशी फार निकटचा संबंध आहे. तेव्हा त्याची प्रथम निवड करणे ओघानेच आले. अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यात आपण फारच जागरूक आहोत, म्हणून अलिगडचे मुस्लीम विद्यापीठही निवडलेच पाहिजे. त्यानंतर बनारसचे हिंदू विद्यापीठ, कारण बहुसंख्य जमातींचेही समाधान केले पाहिजे. आता उत्तर भारतातल्या या तीन विद्यापीठांची निवड झाल्यानंतर दक्षिणेत प्रक्षोभ होणारच. तो टाळण्यासाठी तामिळनाडू, आंध्र प्रदेश, केरळ आणि म्हैसूर या राज्यातील प्रत्येकी एक विद्यापीठ तरी निवडलेच पाहिजे. तसेच पूर्वेकडे उग्र निदर्शने, घेराव वगैरे होऊ नये म्हणून कलकत्ता विद्यापीठाचा क्रम लावलाच पाहिजे. महाराष्ट्राला नेहमीप्रमाणे सर्वांत शेवटी न्याय मिळेल आणि आपले सर्वांत जुने म्हणून मुंबई विद्यापीठ निवडले जाईल. परंतु आपल्या राज्यातही तौलनिक दृष्ट्या अविकसित असलेल्या भागांकडून मागणी येईल. कारण नवे विद्यापीठ स्थापन करावयाचे असल्यास ते शैक्षणिक दृष्ट्या प्रगत भागात नव्हे, तर आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या अविकसित भागात स्थापावे अशी विचारसरणी पुढे येत आहे! थोडक्यात निरनिराळ्या तऱ्हेचे दबाव येऊन "मेजर" विद्यापीठांची संख्या चार वरून चाळीस वर गेली तर आश्चर्य वाटावयास नको. केवळ चार "मेजर" विद्यापीठांची स्थापना करणे व्यवहारतः कसे अशक्य आहे हेही कोठारी आयोगाने लक्षात घेतले नाही.

उच्च शिक्षणाच्या माध्यमाचा आता थोडक्यात विचार करू. या प्रश्नाची तात्त्विक

चर्चा आजवर अनेक अधिकारी व्यक्तींनी विस्तारपूर्वक केली आहे. तिची पुनरुक्ती करण्यात स्वारस्य नाही. परंतु याबाबत महाराष्ट्रातील विद्यापीठांनी कोणते धोरण अंगिकारले आहे त्याची संक्षेपाने माहिती देणे उपयुक्त ठरेल.

उच्च शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न अखिल भारतीय स्वरूपाचा असून तो केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही. तेव्हा यासंबंधीचे धोरण सर्व देशातल्या परिस्थितीचा विचार करूनच ठरविले पाहिजे हे उघड आहे. म्हणून पुणे विद्यापीठाने या समस्येची सर्वांगीण चर्चा व्हावी, आणि सर्व देशाचे धोरण ठरविण्यास तिची मदत व्हावी, यासाठी १९५३ सालच्या मे महिन्यात एक अखिल भारतीय भाषा परिषद बोलावली. तिचा अहवाल १९५४ साली प्रसिद्ध झालेला आहे. परिषदेला केंद्रीय शिक्षण खात्याचे तसेच मुंबई, मद्रास, पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश या राज्य सरकारांचे, आणि म्हैसूर, अलाहाबाद, आग्रा, कलकत्ता, बडोदा, गुजरात, मुंबई इत्यादी विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्याशिवाय वंगीय साहित्य परिषद, कन्नड साहित्य परिषद, महाराष्ट्र साहित्य परिषद, इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेस, इंडियन सायन्स कॉंग्रेस ॲसोसिएशन यांसारख्या संस्थांचे प्रतिनिधीही आले होते. यावरून ही परिषद पुरेशी प्रातिनिधिक होती हे स्पष्ट आहे. उच्च शिक्षणाच्या माध्यमाबाबत पुणे विद्यापीठाने जी भूमिका घेतली होती, ती परिषदेस सर्वसाधारणपणे संमत झाली. या प्रश्नाबाबत विद्यापीठाच्या विद्वत्-सभेच्या एका समितीने १९५१ साली जो अहवाल सादर केला होता आणि जो पुणे विद्यापीठाच्या सर्व अधिकारमंडळांनी मंजूर केला होता, त्यात ही भूमिका मांडलेली आहे. या अहवालातील काही भाग आता उद्धृत करीत आहे, त्यावरून ती स्पष्ट होईल.

" शिक्षणाच्या सर्व स्तरांवर मातृभाषा हेच नैसर्गिक आणि योग्य माध्यम होय. कोणत्याही भाषेचा विकास आणि दर्जा त्या भाषेतून ज्ञानात किती भर पडते आणि ज्ञानाच्या विविध शास्त्रांतील संशोधन किती प्रमाणात प्रसिद्ध होते त्यावर अवलंबून असतो. म्हणून विद्यापीठाच्या सर्व ज्ञानशाखांतून शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा शक्य तितक्या त्वरेने उपयोग व्हावा. परंतु या दृष्टीने प्रगती करण्याच्या मार्गात अनेक अडचणी आहेत याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. उदाहरणार्थ, शासनाच्या सर्वोच्च स्तरावर आज मराठीचा वापर केला जात नाही. जोपर्यंत शासनात मराठीचा वापर होत नाही तोपर्यंत विद्यापीठात शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा सर्रास वापर करता येणार नाही. एवढेच नव्हे तर मराठी ही शासनाची भाषा झाल्यानंतरही याबाबत काही कृती करण्याच्या वेळी भारतातील इतर विद्यापीठांबरोबरचे आणि केंद्र सरकारबरोबरचे संबंध यांचाही विचार करावा लागेल.

अशासारख्या अडचणी दूर झाल्यानंतरही बहुतेक विषयांच्या अध्ययनासाठी

इंग्रजी ग्रंथांचा उपयोग करावाच लागेल. ते ग्रंथ चांगले समजण्याइतपत विद्यार्थ्यांना इंग्रजीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. सध्यासुद्धा महाविद्यालयात प्रथम प्रवेश करण्याच्या वेळी पुष्कळ विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषेचे ज्ञान पुरेसे असत नाही. म्हणून दीर्घकालपर्यंत आपल्या विद्यापीठाने इंग्रजीचे जरूर त्या दर्जाचे ज्ञान विद्यार्थ्यांना होईल अशी काळजी घेतली पाहिजे.

म्हणून विद्यापीठाने याबाबत फार जपून पावले टाकली पाहिजेत. अर्थात याचा अर्थ विद्यापीठाने कोणतीच कृती करू नये असा नव्हे. ''

या धोरणास अनुसरून विद्यापीठाने धीमेपणाने कृती करण्यास सुमारे सतरा वर्षांपूर्वी प्रारंभ केला. आज पुणे विद्यापीठात मराठीचा, परीक्षेचे आणि अध्यापनाचे ऐच्छिक माध्यम म्हणून कला, समाजविज्ञान आणि वाणिज्य या तीन ज्ञानशाखांत पहिल्या पदवीच्या शिक्षणक्रमात उपयोग करता येतो. त्याचप्रमाणे विज्ञानशाखेच्या पहिल्या दोन वर्षांत, आणि इतर ज्ञानशाखांत काही विषयांबाबत पदव्युत्तर स्तरापर्यंतही करता येतो. शिवाजी, मराठवाडा आणि नागपूर विद्यापीठांत हीच परिस्थिती असून मुंबई विद्यापीठानेही अलीकडे मराठी माध्यमातून अल्प प्रमाणात शिक्षण देण्यास परवानगी दिली आहे.

आता मात्र या प्रश्नाचा भावनेच्या आहारी न जाता फेरविचार करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. आताच उल्लेख केलेला अहवाल वीस वर्षांपूर्वीचा असून त्यात व्यक्त केलेल्या काही अपेक्षा फलद्रूप झालेल्या नाहीत. तेव्हा भाषावार प्रांतरचना झालेली नव्हती. महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन दहा वर्षे उलटून गेल्यानंतरही शासनाच्या उच्चतम स्तरावर मराठीचा निरपवाद वापर अजून होऊ शकत नाही. केंद्राशी व्यवहार करण्याची भाषा इंग्रजीऐवजी हिंदी राहील या घटनेतल्या तरतुदीची अंमलबजावणीही दक्षिणेकडील प्रखर विरोधामुळे दीर्घकाल लांबणीवर पडणे अपरिहार्य आहे, आणि महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे इंग्रजीचे ज्ञान वीस वर्षांपूर्वी होते त्यापेक्षाही आज तोकडे आहे. म्हणून विद्यापीठात मराठी माध्यमाचा उपयोग करण्याची गती वाढविण्याऐवजी जास्त मंद केली पाहिजे.

याला दुसरीही काही कारणे आहेत. सर्वच ज्ञानशाखांत मराठी माध्यमाचा वापर करावा असे म्हणणे अव्यवहार्य आहे. वैद्यक व्यवसायाचे नियंत्रण करणाऱ्या मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाला, त्याप्रमाणे वकिली व्यवसायाचे नियंत्रण करणाऱ्या बार कौन्सिललाही, मेडिसिन आणि लॉ यांच्या शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमच हवे आहे. विज्ञानविषयात इतकी झपाट्याने प्रगती होत आहे की, इंग्रजी माध्यमाचा त्याग करणे केवळ आत्मघातकीपणाचे ठरेल. इंग्रजी माध्यमाचा अव्हेर केल्यामुळे ज्ञानाचा कस उतरेल एवढेच नव्हे तर देशाच्या ऐक्यावरही अनिष्ट परिणाम होईल. म्हणून

सारासार विचार करता विद्यापीठीय शिक्षणासाठी मराठी माध्यमाचा अत्यंत मर्यादित उपयोग करावा आणि आणखी अनेक वर्षेपर्यंत इंग्रजी माध्यमच कायम ठेवावे असे माझे निःसंदिग्ध मत आहे.

स्वायत्त महाविद्यालयांची स्थापना आणि परीक्षा–पद्धतीत सुधारणा हे प्रश्न केवळ शैक्षणिक नसून शासकीयही आहेत. तेव्हा त्यांचा विचार इतर काही शासकीय समस्यांबरोबर उद्याच्या शेवटच्या व्याख्यानात करावयाचा आहे.

# व्या ख्या न ति स रे

## शासकीय समस्या

उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी "मेजर" विद्यापीठांची स्थापना करावी ही कोठारी आयोगाने केलेली सूचना कशी तत्त्वतः असमर्थनीय आणि अव्यवहार्यही आहे हे आपण पाहिले. आता आयोगाने स्वायत्त महाविद्यालयांच्या स्थापनेबाबत जी शिफारस केली आहे, तिचा विचार करू.

कोठारी आयोगाने हे मान्य केले आहे की, बहुसंख्य संलग्न महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या पहिल्या पदवीपर्यंतच्या आणि क्वचित पदव्युत्तर शिक्षणाची पातळी विद्यापीठाच्या स्वतःच्या शिक्षण विभागात दिल्या जाणाऱ्या शिक्षणाइतकी उंच असणार नाही. परंतु काही महाविद्यालये चांगले काम करीत आहेत आणि त्यांना विद्यापीठाने उत्तेजन दिले पाहिजे. आयोगाने सुचविले आहे की, संलग्न महाविद्यालयांची गुणवत्तेच्या निकषावर वर्गवारी करावी, आणि ती करताना त्या महाविद्यालयातील प्राध्यापकांची एकूण संख्या व शैक्षणिक पात्रता, ग्रंथालय आणि प्रयोगशाळा याबाबतच्या सोयी, विद्यार्थ्यांची शिस्त, शैक्षणिक प्रयोग करण्याची क्षमता, इत्यादी बाबी ध्यानात घ्याव्या. परंतु या कसोट्या लावून महाविद्यालयांची वर्गवारी करण्यासाठी जरूर ती शासकीय यंत्रणा उभी करणे हे अत्यंत अवघड आहे असे कबूल करून, यासंबंधी तपशीलवार मार्गदर्शन करण्याऐवजी, हा जटिल प्रश्न विद्यापीठ अनुदान आयोगाने संबंधित राज्य सरकारांशी विचार-विनिमय करून सोडवावा असा सोयिस्कर सल्ला कोठारी आयोगाने दिला आहे.

यानंतर स्वायत्त महाविद्यालयांच्या प्रश्नाकडे वळून आयोगाने म्हटले आहे की, एखाद्या मोठ्या विद्यापीठात स्वतःची सुधारणा करून घेण्याबाबत ज्यांनी असाधारण

क्षमता दाखवेली आहे अशी विशेष गुणवत्ता असलेली महाविद्यालये असतील, किंवा फार चांगल्या महाविद्यालयांचा एखादा लहानसा पुंज असेल, तर त्यांना स्वायत्तता देण्याचा विचार करावा. ही स्वायत्तता प्रवेशाबाबतचे स्वतःचे नियम ठरविणे, स्वतःचे अभ्यासक्रम आखणे, स्वतःच्या परीक्षा घेणे इत्यादी बाबतीत असावी. विद्यापीठाचे काम सर्वसाधारण देखरेख करणे, आणि प्रत्यक्ष पदव्या देणे एवढ्यापुरतेच मर्यादित असावे. मात्र एकदा दिलेली स्वायत्तता कायम राहीलच असे नाही. विद्यापीठाने स्वायत्त महाविद्यालयाच्या कार्यक्षमतेचे सतत मूल्यमापन करावे आणि जी महाविद्यालये आपला शैक्षणिक दर्जा टिकवून धरणार नाहीत त्यांची स्वायत्तता रद्द करावी. याबाबत विद्यापीठांच्या कायद्यात तरतूद करावी.

ही सूचना अंमलात आणण्यासाठी कोणती शासकीय कृती करावी लागेल हे आता पाहू. विद्यापीठात ज्या नियमांनुसार प्रवेश दिला जातो त्यांना "स्टॅट्यूट्स" आणि "रेग्युलेशन्स" म्हणतात. प्रथमच दिला जाणारा प्रवेश "स्टॅट्यूट्स्" मधल्या तरतुदींनुसार असतो. त्यात विद्यार्थ्यांने शालान्त परीक्षेत कोणत्या विषयांत उत्तीर्ण झाले असले पाहिजे ते नमूद केलेले असते. महाविद्यालयात दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गात दिला जाणारा प्रवेश सामान्यतः "रेग्युलेशन्स" प्रमाणे असतो. स्टॅट्यूटस् करण्याचा अधिकार विद्यापीठांच्या कोर्टाला किंवा सेनेटला असतो. प्री-डिग्रीच्या वर्गात प्रवेश देण्याबाबतचे जे स्टॅट्यूटस् सध्या महाराष्ट्रातील विद्यापीठांत आहेत ते फार कडक नाहीतच आणि ते शिथिल करण्याकडेच सर्वसाधारण प्रवृत्ती आहे. उदाहरणार्थ, सध्याच्या नियमाप्रमाणे प्री-डिग्रीच्या वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी एस्. एस्. सी. परीक्षेत इंग्रजी विषयात उत्तीर्ण झाले पाहिजे. परंतु ही अट सैल करावी आणि इंग्रजी न घेताही जे विद्यार्थी एस्. एस्. सी. परीक्षा उत्तीर्ण होतील त्यांनाही महाविद्यालयात प्रवेश द्यावा अशी सूचना महाराष्ट्र शासनाने सर्व विद्यापीठांना काही वर्षांपूर्वी केली होती. प्रवेशाबाबतचे नियम ठरविण्याची स्वायत्तता निवडक महाविद्यालयांना द्यावी असे जे कोठारी आयोगाने सुचविले आहे, त्याचा हेतू हे नियम जास्त कडक करण्याचे स्वातंत्र्य द्यावे, ते शिथिल करण्याचे किंवा डावलण्याचे नव्हे हे उघड आहे. कारण स्वायत्त महाविद्यालयात गुणवत्तेला विशेष प्राधान्य द्यावयाचे आहे. तसे स्वातंत्र्य महाविद्यालयांना सध्याच आहे. उदाहरणार्थ, एखाद्या महाविद्यालयाने असे ठरविले की, एस्. एस्. सी. परीक्षेत इंग्रजी विषयात ज्या विद्यार्थ्यांना शेकडा पन्नासपेक्षा कमी गुण आहेत त्यांना प्रवेश द्यावयाचा नाही, तर ते प्रचलित नियमांना धरूनच होईल. तेव्हा काही महाविद्यालयांना प्रवेशाचे नियम ठरविण्याबाबत स्वायत्तता द्यावी असे म्हणण्यास फारसा अर्थ नाही. अभ्यासक्रम ठरविण्याच्या स्वायत्ततेबाबत थोडेसे असेच आहे. विद्यापीठाने मंजूर केलेल्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त गुणवत्ता

वाढविण्याच्या दृष्टीने काही जास्त शिकविण्याची एखाद्या महाविद्यालयाची इच्छा असेल तर त्याला कोणताच प्रतिबंध नाही. काही वेगळे शिकवावयाचे असेल तर मात्र संबंधित नियमात योग्य ती तरतूद करावयास पाहिजे. स्वायत्त महाविद्यालयाने परीक्षा स्वतः घ्यावयाच्या व पदवीमात्र विद्यापीठानेच द्यावयाची आहे. याबाबत नियमात तरतूद करताही येईल, परंतु ते कितपत योग्य होईल याविषयी मी साशंक आहे. स्वायत्त महाविद्यालयातले विद्यार्थी वरच्या दर्जाचेच असावे अशी अपेक्षा आहे. परंतु विद्यापीठाने घेतलेल्या विविध परीक्षांत विशेष प्रावीण्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांना जी पदके, पारितोषिके आणि शिष्यवृत्त्या इत्यादी मिळतात, ती स्वायत्त महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना देता येणार नाहीत.

परंतु खरी शासकीय अडचण स्वायत्त महाविद्यालयांची निवड करताना येणार आहे. खुद्द कोठारी आयोगानेच अशी कबुली दिली आहे की, महाविद्यालयांची वर्गवारी करण्यात शासकीय अडचणी आहेत. त्याच अडचणी स्वायत्त महाविद्यालयांची निवड करताना कदाचित जास्त मोठ्या प्रमाणात उभ्या राहतील. कारण अशा महाविद्यालयांना भरपूर प्रमाणात अनुदान द्यावे लागेल आणि ते मिळविण्यासाठी महाविद्यालयात अहमहमिका लागून दबावाचे राजकारण सुरू होईल. शहरी आणि ग्रामीण, पांढरपेशा वर्गाचे आणि बहुजन समाजाचे, विकसित भागातले आणि अविकसित भागातले अशी चढाओढ लागून नेहमीप्रमाणे सर्वांनाच संतुष्ट करण्यासाठी स्वायत्त महाविद्यालयांची संख्या बेसुमार वाढविली जाईल, आणि विशेष उच्च दर्जाच्या महाविद्यालयांना शैक्षणिक प्रयोग करण्याचे स्वातंत्र्य देऊन उच्च शिक्षणाची पातळी उंचावण्याचा मूळ हेतूच विफल होईल. ही स्वायत्तता मर्यादित काळापुरतीच देणे आणि जरूर पडल्यास विद्यापीठाने ती रद्द करणे हे तर शासकीय दृष्ट्या सर्वथा अशक्य आहे. विद्यापीठांच्या अधिकार-मंडळांची रचना कशी असते, आणि त्यात दबावाचे राजकारण कसे आणि किती चालते याची ज्यांना माहिती आहे, त्यांना या मुद्द्याचे जास्त स्पष्टीकरण करण्याची जरुरी भासणार नाही.

एक शैक्षणिक प्रयोग म्हणून काही मोजक्या महाविद्यालयांना स्वायत्तता जरूर द्यावी, परंतु ती संपूर्ण द्यावी, कोठारी आयोगाने सुचविल्याप्रमाणे अर्धवट नव्हे. म्हणजे अशा महाविद्यालयांनी स्वतःचे अभ्यासक्रम ठरवून स्वतःच्या परीक्षा घ्याव्या. एवढेच नव्हे तर पदव्याही स्वतःच्याच द्याव्यात. त्यांचे विद्यापीठाशी असलेले संलग्नीकरण तोडून टाकावे. अमेरिकेत अशी अनेक महाविद्यालये आहेत. त्यांनी दिलेल्या पदव्यांची किंमत काय आहे हे प्रत्यक्ष अनुभवानेच ठरेल. अशा महाविद्यालयांची संख्या महाराष्ट्रात फक्त सहाच, म्हणजे मुंबई, नागपूर, पुणे, शिवाजी, मराठवाडा आणि एस्. एन्. डी. टी. या विद्यापीठांच्या अधिकारक्षेत्रात प्रत्येकी एक अशी असावी. त्यांची निवड राज्य

सरकारनेच संबंधित विद्यापीठांशी विचारविनिमय करून करावी आणि त्यांना भरपूर प्रमाणात द्रव्यसाहाय्य करावे. दहा वर्षांनंतर यांपैकी ज्या महाविद्यालयांच्या पदवीचा दर्जा निदान विद्यापीठाइतका राहणार नाही त्यांचे अनुदान बंद करावे.

कोठारी आयोगाचा अहवाल प्रसिद्ध होऊन पाच वर्षे होऊन गेली. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत निदान पन्नास स्वायत्त महाविद्यालये स्थापता येतील असा अवास्तव अंदाज आयोगाने केला आहे! आयोगाचे अध्यक्ष डॉ. कोठारी यांनी अहवालाच्या प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, शिक्षणाच्या क्षेत्रातील गंभीर परिस्थिती लक्षात घेता आमच्या शिफारशी त्वरित अमलात याव्यात म्हणून आम्ही आमचा अहवाल जरा घाईनेच सादर करीत आहोत. नाहीतर तो जास्त सुटसुटीत करता आला असता. परंतु ही फारच गौण बाब आहे. खरा गंभीर दोष अहवालाला खंबीर सामाजिक तत्त्वज्ञानाची बैठक नसणे हा आहे. नाहीतर "मेजर" विद्यापीठांच्या स्थापनेसारखी विषमतेला उत्तेजन देणारी प्रतिगामी सूचना केली गेली नसती. मला मिळालेल्या माहितीप्रमाणे कोठारी आयोगाने निरनिराळे अभ्यासगट नेमले आणि त्यांनी केलेल्या संकीर्ण शिफारशींची निश्चित तात्त्विक आणि व्यावहारिक निकष लावून छाननी न करता त्यांचे केवळ संकलन केले. हे का, तर शिफारशींची त्वरित कार्यवाही व्हावी म्हणून. परंतु तीही झाली नाही. अहवाल सादर करून पाच वर्षे होऊन गेल्यानंतरही अंमलबजावणीच्या बाबत फारशी प्रगती झालेली नाही.

आता परीक्षापद्धतीत सुधारणा करण्याच्या प्रश्नाचा शासकीय दृष्टीने विचार करावयाचा आहे. या प्रश्नाची शैक्षणिक व शासकीय अशी दोन अंगे आहेत आणि दोन्हींचा एकत्रित विचार केल्याशिवाय या जटिल समस्येची समाधानकारकपणे सोडवणूक करता येणार नाही. आपल्या सध्याच्या परीक्षापद्धतीतील गंभीर दोषांची जाणीव कोणाला नव्याने करून यावयास नको. त्यांची चर्चा भारतात तरी आज निदान सत्तर वर्षे होत आहे. कोठारी आयोगाने याबाबत पुढीलप्रमाणे मतप्रदर्शन केले आहे.

"सध्याच्या व्यवस्थेत विद्यार्थ्यांचे संपूर्ण भवितव्य वर्षाच्या अखेरीस घेतल्या जाणाऱ्या एकाच परीक्षेने ठरविले जाते. म्हणून विद्यार्थी आपल्या शिक्षकांकडे पुरेसे लक्ष देत नाहीत. सबंध वर्षभर स्वतंत्रपणे अभ्यास करीत नाहीत, आणि वर्षा अखेरीस परीक्षेसाठी घोकंपट्टी करतात. या "एक्सटर्नल" किंवा बहिःस्थ परीक्षांचा उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेवर इतका विपरीत परिणाम होत आहे की, कोणतीही प्रगती करण्यासाठी परीक्षापद्धतीत सुधारणा करणे आवश्यक झाले आहे. ही सुधारणा शिक्षणपद्धतीतील सुधारणेबरोबरच केली पाहिजे. शिक्षणक्षेत्रातल्या या भागाबद्दल असे म्हणता येईल की, या समस्येचे स्वरूप सर्वांना माहीत आहे, तिचे महत्त्व पटलेले आहे आणि तिची सोडवणूक करण्याचा निदान प्रारंभीचा मार्ग तरी ज्ञात आहे. परंतु कोणत्या का

कारणामुळे होईना, याबाबत प्रत्यक्ष कृती मात्र ज्या प्रमाणात व्हावयास पाहिजे त्या प्रमाणात झालेली नाही. निकराने आणि सातत्याने आज कृती करण्याची आवश्यकता आहे. ”

तेवीस वर्षांपूर्वी राधाकृष्णन् आयोगानेही असे म्हटले होते की, उच्च शिक्षणात एकच सुधारणा सुचवा असे आम्हास सांगितले, तर परीक्षा-पद्धतीत सुधारणा करा असे आम्ही सांगू.

या प्रश्नाचे गांभीर्य आणि त्वरित कृती करण्याची आवश्यकता ही दोनही लक्षात घेऊन इंटर युनिव्हर्सिटी बोर्ड ऑफ इंडिया अँड सीलोन या संस्थेने जानेवारी १९७१ च्या अखेरीस दिल्लीत एक सेमिनार आयोजित केला होता. त्यात भाग घेण्यासाठी एक शासकीय अधिकारी आणि एक प्राध्यापक असे दोन प्रतिनिधी पाठविण्याची विनंती भारतातील सर्व विद्यापीठांना करण्यात आली होती. प्रत्येक प्रतिनिधीने चर्चेसाठी एक निबंध सादर केला पाहिजे अशी अट होती. कुलसचिव या नात्याने पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व मी केले. चर्चासत्राच्या प्रारंभी विषयवारीप्रमाणे प्रतिनिधींचे आठ गट करण्यात आले, आणि त्यांनी आपापल्या विषयांची सविस्तर चर्चा करून काही निष्कर्ष काढले. या आठ गटांचे नंतर चार आणि नंतर दोन असे गट करण्यात येऊन भरपूर विचारविनिमय करण्यात आला. शेवटी सर्वांनी एकत्र येऊन सर्वसंमत निष्कर्षांची नोंद करणारे एक निवेदन तयार करून विद्यापीठांना काही शिफारशी केल्या.

या निवेदनात प्रारंभी असे म्हटले आहे की, परीक्षापद्धतीत सुधारणा करण्याची निकड असूनही गेल्या कित्येक दशकांत प्रत्यक्ष कृती फारशी झाली नाही. याचे कारण विद्यापीठांजवळ पुरेशी साधनसामग्री नाही हे नव्हे. प्रचलित परीक्षापद्धतीत अवश्य ते बदल करण्यासाठी आणि काही नवीन उपक्रम सुरू करण्यासाठी जरूर ती साधनसामग्री आजही विद्यापीठांपाशी आहे. परंतु बदल करण्याच्या इच्छेचा मात्र अभाव आहे.

सेमिनारने असे मत व्यक्त केले की, सध्या रूढ झालेली “सार्वजनिक परीक्षा-पद्धति” (System of Public Exminations) कायम राहणार आहे. अलीकडे अंतर्गत मूल्यमापनाचे (internal assessment) प्रयोग झाले आहेत. तत्त्वतः अंतर्गत मूल्यमापनाला आमची मान्यता आहे. परंतु पुरेशी पूर्वतयारी केल्याशिवाय, आणि तिचा दुरुपयोग होणार नाही यासाठी पुरेशी शासकीय दक्षता घेतल्याशिवाय, ही पद्धती मोठ्या प्रमाणात स्वीकारू नये. ज्या सुधारणा करावयाच्या आहेत त्या बहुतांशी प्रचलित सार्वजनिक परीक्षा-पद्धतीतच करावयाच्या आहेत, किंवा या पद्धतीची अंतर्गत मूल्यमापनाशी तारतम्याने सांगड घालून साधावयाच्या आहेत. सध्याची पद्धतच जास्त विश्वसनीय आणि व्यक्तिनिरपेक्ष व्हावी या दृष्टीने सुधारणे ही तातडीची गरज आहे. त्यासाठी काही शिफारशी सेमिनारने केल्या त्यांपैकी प्रमुख पुढीलप्रमाणे आहेत.

(१) प्रश्नपत्रिका काढण्याच्या पद्धतीत त्वरित सुधारणा करणे जरूर आहे. पारंपरिक पद्धतीच्या प्रश्नपत्रिकांत साचेबंदपणा आणि तोचतोपणा असतो. यासाठी त्याच्या दोन भ्रामक समजुती दूर केल्या पाहिजेत. एक म्हणजे शंभर गुणांच्या प्रश्नपत्रिकेत ५ किंवा ६ पेक्षा जास्त प्रश्न असू नयेत. दुसरी म्हणजे आदल्या वर्षी विचारले गेलेले प्रश्न पुन्हा विचारू नयेत. सध्या प्रश्नांची उत्तरे निबंधाच्या रूपाने द्यावी लागतात. ज्यांची उत्तरे थोडक्यात देता येतील अशा निराळ्या तऱ्हेच्या प्रश्नांचाही उपयोग केला पाहिजे. यामुळे सबंध अभ्यासक्रमाबद्दल प्रश्न विचारता येतील आणि घोकंपट्टीला उत्तेजन मिळणार नाही.

(२) काही विद्यापीठात सामुदायिकरीत्या होणारा "कॉपी" करण्याचा गैरप्रकार हा अत्यंत चिंताजनक आहे. याला आळा घालण्यासाठी शिक्षणपद्धतीची कार्यक्षमता आणि गुणवत्ता वाढविणे आणि विद्यापीठीय शासनाची मजबुती करणे हे मार्ग आहेत.

(३) दिवसेंदिवस अमर्यादपणे वाढत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येमुळे विद्यापीठांच्या परीक्षायंत्रणेवर फार ताण पडत आहे. हा यांत्रिकीकरण करून पुष्कळसा कमी करता येईल. विद्यापीठांनी यंत्रांचा जास्तीत जास्त वापर करणे जरूर आहे.

(४) विद्यापीठ अनुदान मंडळाने आणि इंटर युनिव्हर्सिटी बोर्डाने राष्ट्रीय पातळीवर परीक्षाविषयक समस्यांचे संशोधन करण्यासाठी यंत्रणा उभारावी. विद्यापीठांनाही या कामासाठी आपापल्या कार्यक्षेत्रापुरते अभ्यासगट स्थापन करण्यास उत्तेजन द्यावे.

या सर्व सूचना विद्यापीठांना कमी-अधिक प्रमाणात अमलात आणता येण्यासारख्या आहेत. परंतु यातही काही शासकीय अडचणी आहेत. उदाहरणार्थ, प्रश्नपत्रिका काढण्याच्या पद्धतीत सुधारणा करणे हे बरेचसे विद्यापीठाच्या निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासमंडळांवर अवलंबून आहे. कायद्यातील सध्याच्या तरतुदीप्रमाणे अभ्यासमंडळांच्या सभासदांची संख्या प्रमाणाबाहेर वाढली आहे. इंग्रजी, मराठी, अर्थशास्त्र वगैरे विषयांच्या अभ्यासमंडळांचे काही विद्यापीठात पन्नासपेक्षा जास्त सभासद असतात. अर्थात अशा मंडळात शैक्षणिक प्रश्नांची दर्जेदार चर्चा फार क्वचित होते. बहुसंख्य सभासदांचे लक्ष परीक्षकांच्या याद्या तयार करणे आणि पाठ्यपुस्तके नेमणे यावरच केंद्रित झालेले असते. इंटर-युनिव्हर्सिटी बोर्डाच्याच एका समितीने कोणत्याही अभ्यासमंडळाच्या सभासदांची संख्या बारा-पंधरांपेक्षा जास्त असू नये असे काही वर्षांपूर्वी सुचविले होते. यासाठी विद्यापीठांच्या कायद्यातच बदल करावा लागेल. ज्यांची उत्तरे निबंधरूपाने द्यावी लागतात अशा प्रश्नांची संख्या कमी करून निदान काही विषयांत तरी ज्यांची उत्तरे थोडक्यात देता येतील अशा नव्या तऱ्हेच्या प्रश्नांचा

उपयोग करण्याचा प्रयत्न पुणे विद्यापीठाने सुरू केला आहे. परंतु अजून तो पुरेशा प्रमाणात यशस्वी झाला नाही. याचे कारण सध्याच्या अभ्यासमंडळांची अकार्यक्षमता हेच आहे. निरनिराळ्या विद्याशाखांच्या प्रमुखांनी म्हणजे डीन्सनी या प्रश्नाकडे वैयक्तिक लक्ष सातत्याने पुरविले आणि त्याचा पाठपुरावा केला तर दोन-तीन वर्षांत काही प्रगती करणे शक्य आहे. स्वतः कुलगुरूंनी विद्याशाखा-प्रमुखांना या कामासाठी प्रवृत्त करावे.

सामुदायिकरीत्या "कॉपी" करणे, पर्यवेक्षकांवर त्यांनी "कॉपी" करण्यास प्रतिबंध केला तर खुनी हल्ले चढविणे, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना वरच्या वर्गात चढविण्यासाठी निदर्शने आणि घेराव करणे, लाचलुचपतीचा अवलंब करून गुणसंख्येत वाढ करून घेणे इत्यादी भयंकर गैरप्रकारांबाबत भारतातील विद्यापीठांचे दोन गट आहेत हे मला दिल्लीच्या "सेमिनार"मधील चर्चेत भाग घेतल्यानंतर तीव्रतेने जाणवले. पहिला गट उत्तरेकडील आणि पूर्वेकडील विद्यापीठांचा आणि दुसरा पश्चिमेकडील आणि दक्षिणेकडील विद्यापीठांचा. पहिल्या गटातील अनेक विद्यापीठांत हे गैरप्रकार इतक्या मोठ्या प्रमाणावर चालू आहेत की, परिस्थिती सुधारणे जवळजवळ अशक्य होऊन बसले आहे. अत्यंत खेदाची गोष्ट अशी की, त्यास विद्यार्थ्यांबरोबर बरेच शिक्षक आणि कार्यकारिणीचे काही सभासदही जबाबदार आहेत. दुसऱ्या गटातील, विशेषतः महाराष्ट्रातील विद्यापीठांची या बाबतीतील परिस्थिती तुलनेने पुष्कळच चांगली आहे. आपल्याकडेही गैरप्रकार होतात, परंतु सर्वसामान्यपणे परीक्षापद्धती आणि यंत्रणा विद्यार्थ्यांनी विश्वास ठेवावा अशाच आहेत. या संदर्भात एक महत्त्वाची शासकीय उणीव मला जनतेच्या आणि शासनाच्या नजरेस आणून द्यावयाची आहे. काही वर्षांपूर्वी पुणे विद्यापीठाची प्री-प्रोफेशनल, म्हणजे मुंबईत जी इंटर सायन्स म्हणून ओळखली जाते ती, परीक्षा चालू असताना एक गंभीर गैरप्रकार माझ्या नजरेस आला. ज्यांना इंजिनियरिंग किंवा मेडिकल कॉलेजांत प्रवेश मिळवावयाचा आहे, त्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ही परीक्षा फार महत्त्वाची आहे. विज्ञान विषयांची प्रॅक्टिकल्स चालू असताना एका प्रयोग निरीक्षकाने काही विद्यार्थ्यांकडून लाच मागण्यास सुरुवात केली. प्रयोग चालू असताना तो विद्यार्थ्यांना परीक्षा संपल्यानंतर खाजगी रीतीने भेटण्यास सांगत असे आणि पहिल्या वर्गाचे गुण देण्यासाठी पैशाची मागणी करीत असे. एका चांगल्या कुटुंबातल्या विद्यार्थ्याने हा प्रकार स्वतःच्या प्राध्यापकाच्या कानी घातला आणि त्या प्राध्यापकाने माझ्याशी त्वरित संपर्क साधून मला वस्तुस्थिती सांगितली. तेव्हा मी ताबडतोब पोलिसांच्या लाचलुचपत शाखेच्या प्रमुखांना भेटलो आणि त्यांच्यातर्फे आणि विद्यार्थ्याच्या आणि त्याच्या वडिलांच्या सहकार्याने सापळा रचून संबंधित प्रयोग-निरीक्षकाला लाच घेताना मुद्देमालासह पकडले. खेदाची गोष्ट

अशी की, विद्यापीठाने लाचलुचपत विरोधी कायद्याखाली भरलेल्या खटल्यात तो प्रयोग-निरीक्षक निर्दोष सुटला! कारण लाचलुचपत विरोधी कायदा फक्त "पब्लिक सर्व्हंट्स्"नाच लागू आहे आणि विद्यापीठाने नेमलेले परीक्षक "पब्लिक सर्व्हंट्स्"च्या व्याख्येत बसत नाहीत. ही कायद्यात मोठीच उणीव आहे, आणि शासनाने ती तातडीने दूर करणे जरूर आहे.

परीक्षा-यंत्रणेचे यांत्रिकीकरण करणे सहज शक्य आहे, आणि पुणे विद्यापीठाने ते अनेक वर्षांपूर्वी काही प्रमाणात केलेलेही आहे. सारांश, परीक्षापद्धतीत सुधारणा करण्यासाठी दिल्लीच्या सेमिनारने ज्या सूचना केल्या आहेत त्या अमलात आणणे महाराष्ट्रातील विद्यापीठांना जड जाऊ नये.

आता ज्यांना सर्वस्वी शासकीय म्हणता येईल, अशा काही समस्यांची चर्चा करावयाची आहे. विद्यापीठे ही राज्याच्या विधानसभेने संमत केलेल्या कायद्यातील तरतुदीनुसार स्थापन झालेल्या संस्था आहेत. कायद्यात विद्यापीठाचे अधिकारी आणि त्यांच्या नेमणुकीची पद्धत आणि त्यांचे अधिकार, सेनेट किंवा कोर्ट, अ‍ॅकॅडेमिक कौन्सिल आणि एक्झिक्युटिव्ह कौन्सिल किंवा सिंडिकेट यासारख्या अधिकारमंडळांची घटना आणि त्यांचे अधिकार, कुलपतींचे अधिकार, रेग्युलेशन्स, ऑर्डिनन्सेस आणि स्टॅट्यूट्स् आणि ते संमत करण्याची पद्धत, इत्यादींविषयी कलमे असतात आणि त्यानुसार विद्यापीठाची शासनव्यवस्था कार्य करते. या सर्वच बाबींविषयी व्याख्यानाच्या कालमर्यादेत चर्चा करणे शक्य नाही, आणि तशी जरुरीही नाही. महाराष्ट्रातील विद्यापीठांपुरते बोलावयाचे तर कुलगुरूंच्या नेमणुकीची पद्धत, कुलपतींचे कायदेशीर अधिकार, कार्यकारिणी आणि सेनेट किंवा कोर्ट यासारख्या अधिकारमंडळांची घटना व कार्यपद्धती, या महत्त्वाच्या प्रश्नांचा प्रत्यक्ष अनुभवाच्या पार्श्वभूमीवर फेरविचार करणे जरुरीचे आहे.

विद्यापीठांच्या शासनव्यवस्थेसंबंधी विचार करण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने डॉ. प्र. बा. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली दोन वर्षांपूर्वी एक समिती नेमली होती. या समितीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यातील काही शिफारशींचाही परामर्श या संदर्भात घ्यावयाचा आहे. विद्यापीठांच्या शासनव्यवस्थेत कुलगुरूंची नेमणूक किंवा निवडणूक हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न होय. तेव्हा त्याची चर्चा प्रथम करू.

भारतातील विद्यापीठांसाठी "आदर्श घटने"चा विचार करण्यासाठी केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने सुमारे दहा वर्षांपूर्वी डॉ. डी. एस्. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. तिचा अहवाल १९६४ साली प्रसिद्ध झालेला आहे. अहवालात सुरुवातीलाच असे स्पष्टपणे म्हटले आहे की, सर्व विद्यापीठांना लागू करता येईल अशी आदर्श घटना तयार करणे हे अव्यवहार्य आणि निरुपयोगीही आहे.

ज्याचे विभाग शैक्षणिक विकासाच्या निरनिराळ्या अवस्थेत आहेत अशा भारतासारख्या देशात वेगवेगळ्या तऱ्हेची घटना आणि शासनव्यवस्था असलेली विद्यापीठे शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक आहेत. म्हणून समितीने "आदर्श घटना" तयार करण्याचा प्रयत्न न करता काही मूलभूत प्रश्नांचा विचार केला, आणि सर्व विद्यापीठांची उभारणी पुढील दोन तत्त्वांवर केली पाहिजे असे सुचविले.

(१) विद्यापीठ ही बाह्य नियंत्रणापासून मुक्त अशी लोकशाही पद्धतीची शासन-व्यवस्था असलेली स्वायत्त संस्था असली पाहिजे.

आणि (२) विद्यापीठाचे धोरण आणि कार्यक्रम ठरविण्यात प्राध्यापकवर्गाला परिणामकारक रीतीने सहभागी होता आले पाहिजे.

कुलगुरू हे विद्यापीठाचे सर्वांत महत्त्वाचे अधिकारी आहेत. महाराष्ट्रातील आणि भारतातीलही विद्यापीठांत "प्रमुख शासकीय आणि शैक्षणिक अधिकारी" असे स्थान त्यांना कायद्यानेच दिले आहे. उच्च शिक्षणाचा विचार करण्यासाठी इंग्लंडमध्ये लॉर्ड रॉबिन्स यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमण्यात आली होती तिच्या अहवालातही कुलगुरुपदाचे महत्त्व वर्णिलेले आहे. ते उद्धृत करून कोठारी समितीने असे म्हटले आहे की, काही बाबतीत इंग्लंडमधील विद्यापीठांच्या कुलगुरुंच्यापेक्षाही भारतातील विद्यापीठांच्या कुलगुरुंची जबाबदारी जास्त आहे. तेव्हा त्यांची नेमणूक किंवा निवडणूक कोणत्या पद्धतीने करावी या प्रश्नाला असाधारण महत्त्व आहे.

दोन कृषि विद्यापीठे आणि महिलांचे एस्. एन्. डी. टी. विद्यापीठ यांचा या संदर्भात विचार करण्याचे कारण नाही. महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांत आज पुढील-प्रमाणे परिस्थिती आहे :—

(१) मुंबई विद्यापीठात कुलगुरुंची नेमणूक कुलपती करतात. याबाबत कुल-पतींना सल्ला देण्यासाठी कोणतीही समिती नसते. शासनाच्या सल्ल्यानेच नेमणूक केली जाते.

(२) पुणे विद्यापीठात कुलगुरुंची रीतसर निवडणूक कोर्टाच्या सभेत होते. कार्यकारिणीने सुचविलेल्या तीन व्यक्तींतून कोर्टाने निवड करावयाची असते.

(३) नागपूर, शिवाजी आणि मराठवाडा या विद्यापीठांत ज्याला "दिल्ली पॅटर्न" असे म्हणतात, त्या पद्धतीने कुलगुरुंची नेमणूक कुलपती करतात. कुलपतींनी नियुक्त केलेला एक सभासद आणि कार्यकारिणीने नियुक्त केलेले दोन सभासद अशा तिघांची एक समिती नेमण्यात येते आणि तिने तीन किंवा अधिक नावे सुचवावयाची असतात. यांपैकी कोणत्याही एका व्यक्तीची निवड कुलपती करू शकतात. त्यांना एकही नाव पसंत नसले तर नावांची यादी फेरविचारार्थ समितीकडे पाठविली जाते.

महाराष्ट्र राज्याचे शासन सर्वच विद्यापीठांच्या कायद्यात काही दुरुस्त्या करण्याचा

विचार गेली दोन-अडीच वर्षे करीत आहे. दुरुस्तीचा जो मसुदा शासनाने १९६९ साल्याच्या मार्च महिन्यात सर्व विद्यापीठांकडे मतप्रदर्शनासाठी पाठविला, त्यावरून पुणे आणि मुंबई विद्यापीठ.तही " दिल्ली पॅटर्न " सुरू करण्याचा इरादा दिसतो. कोठारी समितीने मात्र सध्याचा " दिल्ली पॅटर्न " योग्य नसल्याचे स्पष्टपणे म्हणून कुलगुरूंची नेमणूक व्हिजिटर किंवा कुलपतींनी करणे किंवा कार्यकारिणीने सुचविलेल्या तीन नावांतून कोर्टाने कुलगुरूंची निवडणूक करणे, या दोनपैकी एक पद्धत निरनिराळ्या विद्यापीठांनी आपापल्या परिस्थितीनुरूप स्वीकारावी असे सुचविले आहे. याचाच अर्थ कोठारी समितीच्या मते मुंबई आणि पुणे विद्यापीठात सध्या प्रचलित असलेली पद्धती " दिल्ली पॅटर्न " पेक्षा चांगली आहे.

" दिल्ली पॅटर्न " बाबतचा मुख्य आक्षेप असा आहे की, नावे सुचविण्यासाठी जी तीन जणांची समिती नेमली जाते तिचा एक सभासद कुलपतींनी नियुक्त केलेला असतो. कुलपती शासनाच्या सल्ल्यानेच ही नियुक्ती करतात आणि म्हणून व्यवहारतः तो सभासद संबंधित मंत्र्यांच्या पसंतीचाच असतो. मंत्र्यांना हवे असलेले नाव कुलपतींना सादर करावयाच्या यादीत घालणे एवढेच त्या सभासदाचे काम असते. यादीत त्या नावाचा क्रमांक कोणता हेही महत्त्वाचे नसते. कारण कुलपती, म्हणजे व्यवहारतः मंत्री, कोणतेही नाव पसंत करू शकतात. म्हणजे लोकशाहीच्या देखाव्याखाली मंत्र्यांच्या मर्जीतल्या व्यक्तीची कुलगुरुपदी नेमणूक करता यावी अशी सोय " दिल्ली पॅटर्न " मध्ये आहे. शिवाय मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या नेमणुकीबाबत अगदी अलीकडे जो " दिल्ली पॅटर्न "चा खेळखंडोबा झाला, त्याने या पद्धतीतील शासकीय उणीवाही स्पष्ट झाल्या. कुलपतींना नावाची शिफारस करण्यासाठी जी समिती नेमावयाची असते, तीवर कार्यकारिणीने नियुक्त केलेले दोन सभासद असतात. माझ्या माहितीप्रमाणे मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीने प्रथम चार नावे कुलपतींना कळविली आणि यातल्या दोघांची तुम्हीच निवड करा असे सुचविले! अर्थात कुलपतींना हे प्रकरण परत कार्यकारिणीकडे पाठवावे लागले आणि दोनच नावे कळवा असे बजावावे लागले. यात कालापव्यय झाला आणि कुलगुरूंची मुदत संपण्याच्या आधी फक्त सुमारे दोनच आठवडे समिती नेमली गेली. नंतर शासनानेही कुलपतींना कित्येक महिने सल्ला दिलाच नाही. शेवटी समितीची फेररचना करावी लागली आणि जुन्या कुलगुरूंची मुदत संपून नव्या कुलगुरूंची नियुक्ती होईपर्यंत जवळजवळ सोळा महिन्यांचा कालावधी गेला! कार्यकारिणीने आणि शासनाने याबाबतीतली आपापली कर्तव्ये योग्य वेळी केलीच पाहिजेत, अन्यथा कुलपतींना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची मुभा राहील अशी कायद्यातच तरतूद करणे अवश्य आहे.

कार्यकारिणीने सुचविलेल्या तीन व्यक्तींतून एकाची कोर्टाने ( म्हणजे सेनेटने )

निवडणूक करण्याची पद्धती पुणे विद्यापीठात सुरुवातीपासून आहे. पहिली अनेक वर्षे पुणे विद्यापीठाचे कुलगुरुपद "मानद" (ऑनररी) होते. ते कोर्टाने अलीकडेच स्टॅट्यूट करून पूर्णवेळचे पगारी केले. त्यानंतर मे १९७० मध्ये झालेली पगारी कुलगुरुंची पहिलीच निवडणूक विद्यापीठाच्या शासनव्यवस्थेला तापदायक ठरली. कार्यकारिणीने तीन नावे निश्चित करण्याच्या आधीपासूनच प्रचाराचा गदारोळ उठला, आणि गटबाजीच्या राजकारणाला ऊत आला. आणि निवडणूक झाल्यानंतर अनेक कायदेशीर मुद्दे उपस्थित करून प्रकरण सुप्रीम कोर्टापर्यंत नेले गेले. सुप्रीम कोर्टाने विद्यापीठाने अवलंबिलेल्या निवडणूक पद्धतीत काहीच बेकायदेशीर किंवा तर्कविसंगत नसल्याचा स्पष्ट अभिप्राय दिला. त्या प्रश्नाची सविस्तर चर्चा करण्याचे आता प्रयोजन नाही. परंतु या प्रकरणाने निर्विवादपणे हे सिद्ध झाले की, कुलगुरुपद पगारी आणि पूर्णवेळचे जेथे असेल, त्या विद्यापीठात कुलगुरुंची कोर्टाने किंवा सेनेटने निवडणूक करण्याची पद्धत विद्यापीठाच्या हिताची नाही.

विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या गजेंद्रगडकर समितीने असे मत व्यक्त केले आहे की, एखाद्या समितीने सुचविलेल्या व्यक्तींपैकी एकाची नियुक्ती व्हिजिटरने किंवा कुलपतीने करणे ही कुलगुरुंच्या नेमणुकीची सर्वोत्तम पद्धत होय. या समितीत संबंधित राज्यसरकारला काही प्रमाणात गुंतवावे असे म्हणून समितीची रचना कशी असावी याबाबत गजेंद्रगडकर समितीने पुढील तीन पर्याय सुचविले आहेत :—

(१) कुलपतींनी किंवा व्हिजिटरने नेमलेला एक आणि कार्यकारिणीने नियुक्त केलेले दोन अशा तीन सभासदांची समिती.

(२) कुलपतींनी नेमलेला एक, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी नेमलेला एक आणि कार्यकारिणीने निवडलेला एक अशा तिघांची समिती.

(३) कुलपतींनी नेमलेला एक, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी नेमलेला एक आणि विद्यापीठाचे तीन प्रतिनिधी अशा पाच जणांची समिती. विद्यापीठाच्या प्रतिनिधींपैकी एक विद्वतसभेने किंवा ॲकॅडेमिक कौन्सिलने आणि दोन कार्यकारिणीने, किंवा दोन विद्वत्सभेने आणि एक कार्यकारिणीने निवडलेला असावा. विद्वत्सभेने आणि कार्यकारिणीने निवडलेले सभासद विद्यापीठाचे नोकर, किंवा विद्वत-सभेचे आणि कार्यकारिणीचे सभासद असता कामा नयेत.

यांपैकी पहिला पर्याय म्हणजे "दिल्ली पॅटर्न"च आहे आणि तो कसा त्याज्य आहे हे आताच आपण पाहिले. दुसऱ्या पर्यायात समितीच्या तीन सभासदांपैकी एक विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी नियुक्त केलेला असावा असे सुचविले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांना कुलगुरुंच्या निवडीच्या राजकारणात गुंतविणे हे सर्वथा अयोग्य आहे असे माझे स्पष्ट मत आहे. उच्च शिक्षणाच्या दर्जावर करडी

नजर ठेवणे आणि गैरप्रकार करणाऱ्या विद्यापीठांना आणि त्यांच्या कुलगुरूंना कडक शब्दांत समज देणे हे जे अनुदान आयोगाचे महत्त्वाचे काम आहे, त्याला याने बाध येईल. म्हणजे दुसरा पर्याय " दिल्ली पॅटर्न " पेक्षाही वाईट आहे. तिसऱ्या पर्यायात कुलगुरूंच्या नेमणुकीसाठी शिफारस करणाऱ्या समितीच्या सभासदांची संख्या पाच असावी, आणि त्यांपैकी तीन विद्वत्सभेने आणि कार्यकारिणीने निवडावे असे सुचविले आहे. हा पर्याय स्वीकारण्याचा अविचार कोणतेही विद्यापीठ करील असे वाटत नाही. अन्यथा त्या विद्यापीठात अभूतपूर्व गोंधळ माजेल ! शासकीय दृष्ट्या इतकी अव्यवहार्य आणि अनुचित सूचना विद्यापीठांचे ज्येष्ठ कुलगुरू जिचे सभासद आहेत त्या समितीने करावी हे विस्मयकारक होय. म्हणजे तिसरा पर्याय दुसऱ्यापेक्षाही वाईट, अतएव त्याज्य आहे.

कुलगुरुपद हे विद्यापीठांतर्गत गटबाजीच्या राजकारणापासून सर्वस्वी मुक्त असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसे न झाले तर विद्यापीठाच्या दैनंदिन कामात पदोपदी विक्षेप येतो असा सर्वत्र अनुभव आहे. कुलगुरूंच्या नेमणुकीत शासनाचा भागही मुळीच असू नये असे म्हणणे हा व्यवहाराशी संपूर्ण फारकत असलेला आत्यंतिक ध्येयवाद झाला. विद्यापीठांना फक्त विकास योजनांसाठी केंद्र सरकारकडून आर्थिक साहाय्य मिळते. दैनंदिन खर्चासाठी त्यांना राज्य सरकारच्या अनुदानावरच अवलंबून राहावे लागते. तेव्हा कुलगुरूंच्या नेमणुकीत राज्य सरकारचा सहभाग केवळ अपरिहार्यच नव्हे तर काही प्रमाणात इष्टही आहे. तेव्हा सर्व परिस्थितीचा विचार करता कुलगुरूंची नेमणूक कुलपतींनी करावी हीच पद्धती सगळ्यात चांगली आहे. याबाबतीत मुंबई विद्यापीठाच्या कायद्यात पुढील तरतूद आहे :—

10 (1) " The Chancellor shall appoint the Vice-Chancellor who shall hold office for three years, and shall be eligible for reappointment. "

हीच तरतूद थोडा फरक करून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना लागू करावी. फरक असा :—

" The Chancellor shall appoint the Vice-Chancellor who shall hold office for five years, and shall be eligible for re-appointment only once, provided that at the time of re-appointment his age shall not be more than sixty-three years.

The Vice-Chancellor shall be a full time salaried officer, and the eonditions of his service shall be determined by Statutes. "

कुलपतींना सल्ला देण्यासाठी कोणत्याही समितीची तरतूद कायद्यात नसावी.

कोणाचाही सल्ला घेण्या न घेण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य कुलपतींना असावे. असे केले तर कुलगुरुपदासाठी योग्य व्यक्तींची नेमणूक होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढेल असे मला वाटते.

या ठिकाणी एका लहान मुद्द्यांचा खुलासा करणे जरूर आहे. आताच केलेल्या विवेचनाच्या संदर्भात गजेंद्रगडकर समितीने "व्हिजिटर" हा शब्द वापरला आहे, "चान्सेलर" किंवा कुलपती हा नव्हे. सध्या राज्याचे गव्हर्नर हे पदसिद्ध "चान्सेलर" असतात. गजेंद्रगडकर समितीने असे सुचविले आहे की, गव्हर्नर हे पदसिद्ध "व्हिजिटर" असावेत आणि "चान्सेलर" किंवा कुलपती या पदावर "व्हिजिटर"ने कार्यकारिणीने शिफारस केलेल्या एका उच्चपदस्थाची किंवा मोठ्या विद्वानाची नेमणूक करावी. कुलपतीला विद्यापीठाच्या पदवीदान समारंभप्रसंगी अध्यक्ष-पद भूषविण्याचा हक्क असावा. परंतु त्याला कोणतेही शासकीय अधिकार नसावेत. असे केवळ शोभेचे पद निर्माण करण्यात शासकीय दृष्ट्या काय फायदे आहेत यांचे काहीच विवेचन गजेंद्रगडकर समितीने केले नाही. यामुळे एखाद्या मान्यवर व्यक्तीचा विद्यापीठाशी संबंध येईल एवढेच म्हटले आहे. म्हणजे कुलगुरुंनी काम करावयाचे, जबाबदाऱ्या पत्करावयाच्या, प्रसंगी वाईटपणाही घ्यावयाचा, परंतु मानसन्मान मात्र दुसऱ्यालाच मिळावयाचा अशी ही हास्यास्पद योजना आहे. तिचा गंभीरपणे विचार करण्याचे कारण नाही. राज्याचे गव्हर्नर हे पदसिद्ध "चान्सेलर" म्हणजे कुलपती असावे ही सध्याची तरतूद योग्य आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठांसाठी "व्हिजिटर"चे नवे पद निर्माण करण्याचे काहीच कारण नाही.

कुलपतींना आपली विद्यापीठविषयक कर्तव्ये योग्य रीतीने आणि विनाविलंब पार पाडणे शक्य व्हावे यासाठी त्यांना सध्या उपलब्ध असलेली शासनयंत्रणा मजबूत करावी लागेल. पूर्वी मुंबई हे एकच विद्यापीठ जेव्हा मुंबई राज्यात होते, तेव्हा विद्यापीठाची प्रकरणे कुलपतींकडे फारच क्वचित् जात. विद्यापीठांची संख्या आता पुष्कळच वाढली असून सध्या महाराष्ट्रात दोन कृषि विद्यापीठे धरून एकूण आठ विद्यापीठे आहेत. त्यांची संख्या आणखी दोन वर्षांत दहा होईल. कुलपतींकडे निर्णया-साठी म्हणजे "रूलिंग"साठी पाठविण्यात येणाऱ्या प्रकरणांची संख्याही फार वाढली आहे. परंतु त्यांच्या कार्यालयातील शासकीय व्यवस्था मात्र जवळजवळ वीस वर्षांपूर्वी होती तशीच आहे. ही परिस्थिती त्वरेने बदलणे आवश्यक आहे.

राज्याचे गव्हर्नर हे पदसिद्ध कुलपती असतात. राज्याचा कारभार करताना गव्हर्नरांना मंत्रिमंडळाचा किंवा संबंधित मंत्र्यांचा सल्ला स्वीकारावा लागतो. परंतु विद्यापीठविषयक कारभारात कुलपतींना मंत्र्यांचा सल्ला बंधनकारक आहे की कसे, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे तर या प्रश्नाला १९५४ साली

तोंड फुटले. पुणे विद्यापीठाच्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे कुलपतींनी नियुक्त केलेल्या पंचवीस व्यक्ती कोर्टाच्या सभासद असतात आणि त्यांची मुदत पाच वर्षांची असते. १९५४ साली पुणे विद्यापीठाच्या कोर्टावर पंचवीस व्यक्तींची नियुक्ती करण्याचा प्रश्न जेव्हा उपस्थित झाला, तेव्हा सर गिरिजाशंकर बाजपेयी हे गव्हर्नर होते. तेव्हाचे मुख्य मंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी असा आग्रह धरला की, ज्या व्यक्तींची शिफारस मंत्र्यांकडून केली जाईल, त्यांचीच नेमणूक कुलपतींनी केली पाहिजे. उलट सर गिरिजाशंकर यांनी असा पवित्रा घेतला की, चान्सेलर किंवा कुलपती म्हणून मला काही स्वतंत्र अधिकार आहेत आणि मंत्र्यांचा सल्ला स्वीकारण्याचे मजवर कायदेशीर बंधन नाही. हा वाद कायदेशीर सल्ल्यासाठी केंद्र सरकारपर्यंत गेला आणि माझ्या माहितीप्रमाणे सर गिरिजाशंकर बाजपेयी यांचे मत बरोबर असल्याचा केंद्राने अभिप्राय दिला. परंतु असाही शेरा मारला की, राज्यपाल हा राज्याबाहेरचा असल्यामुळे त्याला मंत्र्यांइतकी अंतर्गत परिस्थितीची तपशीलवार माहिती असत नाही. तेव्हा केवळ कायद्याच्या दृष्टीने कुलपतींना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असले, तरी त्यांनी मंत्र्यांचा सल्ला घेतलेला बरा. हा कायदेशीर हक्क केव्हा आणि कोणत्या प्रकरणात बजावावयाचा हे अर्थात सर्वस्वी कुलपतींवर अवलंबून आहे. व्यवहारतः विद्यापीठांच्या कारभारविषयक प्रश्नात मंत्र्यांचाच सल्ला स्वीकारला जातो.

विद्यापीठ ही कायद्याने प्रस्थापित झालेली संस्था असून तिचा कारभार रेग्युलेशन्स, ऑर्डिनन्सेस, स्टॅट्यूट्स् इत्यादी निरनिराळ्या अधिकारमंडळांनी केलेल्या नियमांनुसारच चालला पाहिजे, हे उघड आहे. परंतु काही वेळा कायद्यातील आणि नियमातील तरतुदींकडे पुरेशा काटेकोरपणे लक्ष पुरविले जात नाही. मुंबई विद्यापीठातल्या अशा एका महत्त्वाच्या बाबीकडे मला सर्व संबंधितांचे लक्ष वेधावयाचे आहे.

संलग्न आणि घटक महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वेतनश्रेणी आणि सेवानियम ठरविणे हे सर्व विद्यापीठांचे एक महत्त्वाचे काम आहे. हे कार्य करण्याचा हक्क विद्यापीठाच्या कोणत्या अधिकारमंडळाचा आहे, आणि तो कोणती कार्यपद्धती अवलंबून बजावावयाचा आहे, याबाबतच्या तरतुदी प्रत्येक विद्यापीठाच्या कायद्यात अंतर्भूत आहेत. मुंबई विद्यापीठाने दिनांक १२ फेब्रुवारी, १९७१ रोजी सर्व घटक महाविद्यालयाना एक परिपत्रक पाठवून सेनेटने मंजूर केलेले प्राध्यापकांचे सेवानियम कळविले आणि त्यांची तातडतोब अंमलबजावणी करावी असा आदेश दिला. या संदर्भात सेनेटने स्टॅट्यूट न करता केवळ एक ठराव केल्याचे जेव्हा माझ्या निदर्शनास आले तेव्हा मला जरा आश्चर्य वाटले. कारण पुणे, शिवाजी, मराठवाडा इत्यादी महाराष्ट्रातील इतर विद्यापीठात या बाबतीत कोर्टाने किंवा सेनेटने स्टॅट्युट केलेले आहेत. म्हणून मी मुंबई विद्यापीठाच्या कायद्यातील संबंधित कलमे पाहिली. ती थोडक्यात

पुढीलप्रमाणे आहेत.

( १ ) कलम २२ मध्ये जे सेनेटचे अधिकार दिलेले आहेत त्यात पुढील पोट-कलम आहे :—

( 1 ) ( xv ) To lay down scales of salaries and conditions of employment of members of the staff in constituent colleges and constituent recognized institutions, and to ensure the observance of the same through the Syndicate.

( २ ) कलम ४६ मध्ये सेनेटने स्टॅट्युट कोणत्या बाबतीत केले पाहिजेत याचा खुलासा असून ( n ) हे पोटकलम पहा :—

( n ) All matters which, by this Act, are to be or may be prescribed by Statutes.

( ३ ) कलम ५६ मध्ये विद्यापीठाचे आणि घटक महाविद्यालयांचे संबंध स्पष्ट केलेले असून ते स्टॅट्युटसमधील तरतुदींप्रमाणे नियंत्रित केले जातील असे म्हटले आहे. हे स्टॅट्युटस कोणत्या विषयासंबंधी केले जातील हे विशद करणारी जी पोटकलमे आहेत त्यात एक पुढीलप्रमाणे आहे :—

( 3 ) ( 1 ) to lay down minimum educational qualifications for the different classes of teachers and tutorial staff employed by such colleges and institutions **and the conditions of their service.**

मुंबई विद्यापीठाच्या कायद्यातील या तरतुदींचा अपरिहार्य निष्कर्ष असा की, घटक महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वेतनश्रेणी आणि सेवानियम ठरविण्याचा अधिकार सेनेटला आहे. ज्या बाबींबद्दल स्टॅट्युट केले पाहिजेत अशी खुद्द विद्यापीठाच्या कायद्यातच तरतूद आहे त्या बाबतीत स्टॅट्युटच केले पाहिजेत, नुसते ठराव करून चालणार नाही. आणि घटक महाविद्यालयातील प्राध्यापकांचे सेवानियम स्टॅट्युनेच नियंत्रित होतील. सेनेटने फक्त ठराव केलेला असल्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या दिनांक १२–२–१९७१ च्या परिपत्रकाला कायद्याचे अधिष्ठान नाही.

अनवधानाने का होईना, पण स्टॅट्यूट न केल्यामुळे कुलपतींच्या अधिकारालाही डावलण्याचा प्रकार घडलेला आहे. कलम ४७ मध्ये असे स्पष्ट म्हटले आहे की, सेनेटने संमत केलेला प्रत्येक स्टॅट्युट संमतीसाठी कुलपतींना सादर केला पाहिजे आणि त्यांची संमती मिळाल्याशिवाय तो अमलात येणार नाही.

ही परिस्थिती प्राध्यापकवर्गाच्या मुळीच हिताची नाही. त्यांच्या प्रतिनिधींनी सेनेटकडून स्टॅट्युट करवून घ्यावा. कुलपतींनीही या प्रश्नाची दखल घ्यावी आणि कायदेशीर बाजूची छाननी करून मुंबई विद्यापीठाला योग्य तो आदेश द्यावा.

आतापर्यंत केलेल्या विवेचनाचा सारांश असा सांगता येईल—

( १ ) आपल्या सामाजिक उद्दिष्टांबद्दल सत्ताधारी पक्षातच नव्हे, तर स्वतःला पुरोगामी म्हणविणाऱ्या विरोधी पक्षातही वैचारिक गोंधळ असल्यामुळे शिक्षणाच्या क्षेत्रातही साहजिकपणे अराजक माजले आहे.

( २ ) शैक्षणिक मूल्यांचा संबंध नसलेल्या राजकीय कारणांसाठी चुकीचे शासकीय निर्णय घेतले गेल्यामुळे पहिल्या पदवीची आणि पदव्युत्तर शिक्षणाची गुणवत्ता खालावत आहे. आणि

( ३ ) विद्यापीठांच्या शासनव्यवस्थेत व्यक्तिमाहात्म्य वळावण्याची प्रवृत्ती वाढत असून नियमांच्या काटेकोर अंमलबजावणीकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. राजकीय क्षेत्रात व्यक्तिनिष्ठ कारभाराची जी अनिष्ट प्रथा गेल्या पंचवीस वर्षांत पडली आहे, ती आता विद्यापीठापर्यंत येऊन पोचली आहे. तेथे ती बद्धमूल होऊ देता कामा नये. विद्यापीठांचा कारभार तत्त्वनिष्ठ आणि नियमनिष्ठच असला पाहिजे. व्यक्तिनिष्ठ केव्हाही असता कामा नये.

१९६६ साली कोठारी आयोगाचा अहवाल जेव्हा प्रसिद्ध झाला तेव्हा सत्ताधारी पक्षातील वैचारिक गोंधळाची परिस्थिती कायम होती. त्यामुळे साहजिकपणे त्या अहवालाला भक्कम तात्त्विक बैठक लाभलेली नाही. अलीकडे मात्र वैचारिक संघर्ष आणि सत्तास्पर्धा या दोन कारणांमुळे सत्ताधारी पक्षात फूट पडली. त्यामुळे जुनाट विचार-सरणीचे अनेक वयोवृद्ध नेते दूर फेकले गेले ही अत्यंत स्वागतार्ह घटना होय. परंतु यात सत्तास्पर्धेचा भाग अधिक असून नव्या सत्ताधारी पक्षालाही सुस्पष्ट विचारसरणी आणि मजबूत तात्त्विक पाया असल्याचा प्रत्यय अजून तरी आला नाही. अशा परि-स्थितीत अंतःप्रेरणा किंवा साक्षात्कार यांचा स्वीकार करून नानातऱ्हेच्या अंधश्रद्धांना उत्तेजन देणाऱ्या, चातुर्वर्ण्यव्यवस्था मनोमन मानणाऱ्या, विज्ञानाला विरोध करणाऱ्या आणि व्यक्तिमाहात्म्य वाढविणाऱ्या जुन्या गांधीयुगाची समाप्ती व्हावी, आणि बुद्धि-प्रामाण्यवादाचा आणि वैज्ञानिक दृष्टिकोणाचा निरपवादपणे स्वीकार करणाऱ्या, व्यक्तीला अवास्तव महत्त्व न देणाऱ्या, आणि सर्वच पक्षांनी अतिरिक्तपणे वापर करून अर्थहीन बनविलेल्या "समाजवाद" या शब्दाला नवा आशय प्राप्त करून देणाऱ्या नव्या गांधी युगाची सुरुवात व्हावी, अशी जर इच्छा असेल, तर विद्यापीठातील विद्वानांनी सत्ताधारी पक्षाला हितकारक असेल तेच स्पष्टपणे बोलून वैचारिक मार्गदर्शन केले पाहिजे. लोकाभिमुखतेच्या नावाखाली लोकानुरंजन करण्याची राजकारणी नीती विद्यापीठांनी अनुसरता कामा नये.

महाराष्ट्रातील विद्यापीठांना जडलेले रोग असाध्य नाहीत. उत्तरेकडील आणि पूर्वेकडील अनेक विद्यापीठांची प्रकृती सुधारण्याच्या पलीकडे गेलेली आहे. त्या मानाने

आपल्या विद्यापीठांची परिस्थिती पुष्कळच चांगली आहे. त्यात निःस्वार्थ ज्ञानोपासना करणारे अनेक विद्वान आहेत आणि कार्यक्षम शासकही आहेत. परंतु विद्यापीठांतील गटबाजीचा उबग येऊन ते अलिप्त राहतात, आणि म्हणून निरनिराळ्या अधिकार-मंडळांवर आपला प्रभाव पाडू शकत नाहीत. ते पुरेसे संघटित होतील तर महाराष्ट्रातील विद्यापीठांना निर्भय वैचारिक नेतृत्वाचे, शुद्ध ज्ञानोपासनेचे, आणि व्यक्तिनिरपेक्ष निर्मळ शासनव्यवस्थेचे आदर्श भारतातील इतर विद्यापीठांना घालून देणे अवघड असले, तरी अशक्य नाही.

# संदर्भ ग्रंथांची सूची


(1) AIRAN, J. W., BARNBAS, T, and SHAH, A. B. : Climbing a wall of Glass: Aspects of Educational Reforms in India. Bombay, Manaktalas. 1965.

(2) BANERJEE, Pramathanath And Others, Ed. : Hundred Years of the University of Calcutta. University of Calcutta, 1957.

(3) DAICHES, David, Ed. : The Idea of a New University, an Experiment in Sussex. London. Andre Deutsch, 1964

(4) DONGERKERY, S. R. : A History of the University of Bombay, 1857-1957. Bombay. University of Bombay. 1957.

(5) DONGERKERY, S. R. : Memoirs of Two Universities. Bombay. Manaktalas. 1966.

(6) DONGERKERY, S. R, : Universities and Their Problems Bombay, Hind Kitabs Ltd., 1948.

(7) GADGIL, Dr. D. R. : Convocation Address. Poona University. 1966.

(8) Government of India, Ministry of Education. : Indian University Administration. Manager of Pulications 1958.

(9) LETHBRIDGE, Roper. : High Education in India. A Plea for the State Colleges. London. Wm. H. Allen and Co., 1882.

(10) LORD ROBBINS. : Report on Higher Education. London. Her Majesty's Stationery Office. 1965.

(11) NURULLAH, Syed and NAIK, J. P. : A History of Education in India (During the British Period) Bombay. Macmillan and Co. 1951.

(12) Report of the Committee appointed to review "the working of University teaching arrangements." : Poona University. 1957.

(13) Report of the Committee on "Model Act for Universities." : Ministry of Education Government of India, New Delhi. 1964.

(14) Report regarding the "Bharatiya Bhasha Vikas Parishad." : Poona University. 1964.

(15) Report of the Committee on "Governance of Universities and Colleges." Part I. : University Grants Commission. 1971.

(16) Report of the Seminar on Examinations held in January 1971. : Inter University Board of India and Ceylon. 1971.

(17) Report of the University Education Commission Vol. I and II. : Government of India, Ministry of Education, 1949

(18) Report of the Education Commission 1964-66 : Government of India, Ministry of Education, 1966.

(19) SHAH, A. B. Ed. : Higher Education in India. Bombay. Lalwani Publishing House. 1967.

(20) White Paper ( Draft ) ( Outlining the Educational Reconstruction proposed to be undertaken. ). : Government of Maharashtra, Bombay. 1968.